जुलै, २०२५



# आपलं मंत्रालय

एक सुसंवाद

*अतिथी संपादक*

**डॉ. किरण कुलकर्णी**

सचिव, मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन.

जैन चित्रकला ही १६-१७ व्या शतकातील भारतीय लघुचित्रांची शैली आहे, जी जैन समुदायात उगम पावली.


जैन चित्रे त्यांच्या गुंतागुंतीच्या तपशीलांसाठी ओळखली जातात. ज्यात बहुतेकदा जैन पौराणिक कथा आणि धर्मग्रंथांतील संदर्भ प्रतिबिंबित असतात. सूक्ष्म तपशील, लक्षवेधक रंग, लघुशैली ही या चित्रकलेची वैशिष्ट्ये आहेत. जैन चित्रकलेची संकल्पना बहुतांश जैन पुराण कथा, आध्यात्मिक विषयावर आधारित असते. जैन चित्रकला ही भारतीय संस्कृतीचा एक समृद्ध वारसा आहे. या शैलीत श्रीमती वैदना जैन, अवर सचिव यांनी रेखाटलेली काही चित्रे....









## ६ चहाचा इतिहास

जगातील सर्वात लोकप्रिय पेय म्हणजे 'चहा' होय. जगातल्या बहुतेक सर्वच देशात पेय म्हणून चहाचा वापर आहे. भारतात शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही प्रकारच्या लोकांमध्ये आदरातिथ्याचा भाग म्हणून चहापानाला महत्त्व आहे.

## ११ टाटा : परीसस्पर्श

ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांच्यासोबतच्या बैठकीत लक्षात राहिलेला क्षण म्हणजे, पर्यटन विभागाच्या सचिवांनी कोकणमध्ये फिरते वा तरंगते सप्ततारांकित हॉटेल बांधण्याची व पर्यटनाला चालना देण्याची डोळे दिपवून टाकणारी योजना मांडली.

## १४ भारतातील प्राचीन रंगांचा इतिहास!!

भारतीय उपखंडातील लेण्या म्हणजे केवळ दगडात कोरलेल्या गुहा नाहीत, तर त्या रंगरूपाने नटलेल्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि कलात्मक परंपरेचे साक्षीदार आहेत. विशेषतः अजिंठा आणि पितळखोरे लेण्या या केवळ स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने नव्हे, तर चित्रकलेच्या दृष्टिकोनातूनही जगप्रसिद्ध आहेत.

## १६ महाराष्ट्र धर्माच्या सांस्कृतिक वाटचालीची वारी



वारीची परंपरा संत ज्ञानेश्वर महाराजांपासून सुरू झाली आणि पुढे जगद्गुरू संत तुकाराम महाराजांनी त्याला भव्य स्वरूप प्राप्त करून दिले. आषाढी वारीनिमित्त पांडुरंगाच्या दर्शनाला पायी चालत जाण्याच्या या परंपरेला वारी असे म्हणतात.

## २२ मुलांचा आहार आणि व्यक्तिमत्त्व

खाण्याच्या बाबतीत एक गोष्ट ध्यानात ठेवणे अतिशय महत्त्वाचे आहे, ती म्हणजे, व्यक्ती तितक्या प्रकृती. खाण्यामधील एखादा पदार्थ एकाला चालला म्हणून दुसऱ्याला चालेल हे गृहीत धरू नये व मुलामुलींच्या खाण्याची तुलना करू नये. जे आरोग्यासाठी व व्यक्तिमत्त्व विकासासाठी योग्य ठरत नाही, यासाठी काही तत्त्वांचे पालन करणे लाभदायी ठरू शकेल.

## २९ अभिजात मराठी भाषा सप्ताह

राज्यस्तरीय उपक्रमांतर्गत अभिजात मराठी भाषा दिवसाचे औचित्य साधून विविध ग्रंथांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. तसेच ऑनलाइन मराठी : दशा आणि दिशा, अभिजात मराठी भाषेबाबत महाराष्ट्र शासनाच्या भविष्यातील योजना या विषयांवर परिसंवाद आयोजित करण्यात येणार आहे.

## ३० वेगळ्या वाटा

'आपलं मंत्रालय' या मासिकातील 'वेगळ्या वाटा' या सदरातून शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या पाल्यांनी विविध क्षेत्रांमध्ये मिळवलेल्या उल्लेखनीय यशाचा आढावा घेतला जात आहे.

## ३६ भावनिक बुद्धिमत्तेची गुरुकिल्ली

डॅनिअल गोलमन यांचे 'इमोशनल इंटेलिजन्स' हे पुस्तक म्हणजे हुशार असणे म्हणजे काय हे नव्याने सांगणारे, हुशारीसंबंधीच्या जुन्या समजुतींना हादरवून टाकणारा संदर्भग्रंथच म्हणावा लागेल...


चहाचा इतिहास ६

मा. न्यायालय आणि शालेय शिक्षण

विभाग एक आंतर संवाद! ८

पावसाळ्यातील सर्व्हिसिंग वाहनांची नाही, आपली..! ९

टाटा : परीसस्पर्श ११

देवनागरी भाग-३ १२

भारतातील प्राचीन रंगांचा इतिहास!! १४

महाराष्ट्र धर्माच्या सांस्कृतिक वाटचालीची वारी १६

लम्हा लम्हा १९

कविता २०-२१

मुलांचा आहार आणि व्यक्तिमत्त्व २२

एक मंतरलेली सांजवेळ... २३

नोकरी करता करता ज्ञानार्जन २५

अक्षर जगताचे अनभिषिक्त सम्राट अशोक परब २७

अभिजात मराठी भाषा सप्ताह २९

वेगळ्या वाटा ३०

चला गं, सखी खेळू या... ३२

ज्ञानेश्वरी एक अद्भुत ग्रंथ ३४

भावनिक बुद्धिमत्तेची गुरुकिल्ली ३६

वर्ष ३ रे । अंक ४ । जुलै, २०२५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# आपलं मंत्रालय

## संपादन

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संकल्पना, मुखपृष्ठ — अजय भोसले
- व्यवस्थापकीय संपादक — हेमराज बागुल
- संपादक — केशव करंदीकर
- सहसंपादक — अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.
Email : aaplemantralay@gmail.com

फॉलो करा...www.twitter.com&MahaDGIPR
लाइक करा...www.facebook.com&dgipr

**प्रतिक्रियांचे स्वागत**

आपलं मंत्रालय या नियतकालिकाची गुणवत्ता वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आणि सूचनांचे स्वागत आहे.

**'आपलं मंत्रालय' नियतकालिक ही गृहपत्रिका असून या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.**

# बुद्धिबळाच्या आंतरराष्ट्रीय पटावर महाराष्ट्राचा अभिमान!

महिला बुद्धिबळ विश्वचषक जिंकून ग्रँडमास्टर दिव्या देशमुख यांनी भारताचा झेंडा जागतिक बुद्धिबळपटावर अभिमानाने फडकावला आहे. विशेषतः महाराष्ट्राची पहिली महिला ग्रँडमास्टर म्हणून त्यांनी इतिहास रचला आहे.

दिव्याच्या या यशामुळे महाराष्ट्राचे नाव बुद्धिबळाच्या आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. आतापर्यंत आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये ४० वेळा भारताचे प्रतिनिधित्व करत त्यांनी ३५ पदके पटकावली आहेत. ज्यामध्ये २३ सुवर्ण, ७ रौप्य आणि ५ कांस्य पदकांचा समावेश आहे.



दिव्या देशमुख यांनी दुसऱ्याच प्रयत्नात महिला बुद्धिबळ विश्वचषक जिंकत मोठा टप्पा गाठला. त्या महिला कँडिडेट्स स्पर्धेसाठी पात्र ठरणाऱ्या पहिल्या किशोरवयीन भारतीय बुद्धिबळपटू ठरल्या असून, आता भारताच्या चौथ्या महिला ग्रँडमास्टर म्हणून ओळखल्या जातात.

या स्पर्धेत उपविजेती ठरलेल्या ग्रँडमास्टर कोनेरू हम्पी यांच्यासोबत दिव्याची झुंज संपूर्ण बुद्धिबळ जगताचे लक्ष वेधणारी ठरली. या दोघींच्या खेळातील आक्रमकता, समजूतदारपणा आणि खेळावरची पकड ही भारतीय बुद्धिबळ क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरली आहे.

दिव्याच्या या यशामध्ये तिच्या प्रशिक्षकांचे, मार्गदर्शकांचे; तसेच तिच्या कुटुंबीयांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या मेहनतीमुळेच हा सुवर्णक्षण साकार झाला.

दिव्याचे यश हे भारतातील नवोदित बुद्धिबळपटूंना नक्कीच प्रेरणा देणारे आहे आणि या विजयामुळे भारताच्या क्रीडा परंपरेत नवा झळाळता अध्याय जोडला गेला आहे.

# संवेदनेच्या स्पंदनातून साकारलेले विचारविश्व

लेखन हे केवळ शब्दांचं माध्यम नसून ते माणसाच्या विचारशक्तीचा, अनुभवसंपन्नतेचा आणि अंतर्मुखतेचा एक जिवंत आविष्कार असतो. सांस्कृतिक स्मृतींचा ठेवा, शिक्षणसंस्थांची शिस्तबद्ध वाटचाल, न्यायसंस्थेची सजगता आणि मानवी भावविश्वातील असंख्य छटा या साऱ्या बाबी जेव्हा लेखनरूपानं प्रकटतात, तेव्हा वाचकाला एका सखोल विचारयात्रेचा अनुभव मिळतो. हे लेखन केवळ माहितीपुरते मर्यादित राहत नाही; ते वाचकाला अंतर्मनाशी, समाजाशी आणि संस्कृतीशी नवे नाते जोडायला भाग पाडते.

समाजाचा प्रवास केवळ योजनांच्या चौकटीत, शासकीय संरचनेच्या बंधनात किंवा नियमांच्या निकषांवरच घडत नाही; तो घडतो संवेदना, संवाद, संस्कृती आणि समजूतदारपणाच्या आधारावर. ही प्रक्रिया यंत्रणांइतकीच मानवी आहे, जिवंत आहे. ती आकडेवारीच्या पलीकडची आहे आणि म्हणूनच ती अधिक मोलाची आहे.

याच भावभूमीवर साकारलेला हा विशेषांक म्हणजे विचारांच्या विविध आयामांचा एक अभिजात संगम आहे. येथे शब्द केवळ भाष्य करीत नाहीत, तर अनुभवाला आकार देतात; येथे लेख केवळ निबंध नाहीत, तर अंतःकरणाशी संवाद साधणारी जाणिवांची अभिव्यक्ती आहेत. सामाजिक रचना ही केवळ प्रशासकीय आराखडे, धोरणे किंवा शासकीय निर्णय यांच्यामुळे घडत नाही, तर ती घडते एका जिवंत प्रक्रियेतून. जी संवेदनशीलतेने जपली जाते, संवादातून समृद्ध होत जाते, सांस्कृतिक वारशातून प्रेरणा घेते आणि सामूहिक समजुतीच्या आधारे भविष्याची दिशा शोधते.

शासन, समाज आणि व्यक्ती यांच्यात असणारे सूक्ष्म; पण अत्यंत अर्थपूर्ण धागे हेच आपल्या समाजाचे खरे स्वरूप दर्शवतात. या धाग्यांची गुंफण समजून घेण्यासाठी आवश्यक असते बारकाईने पाहणारी नजर, जाणीवपूर्वक अनुभवणारे मन आणि विचारशीलतेच्या गाभ्याशी संवाद साधणारे लेखन.

या विशेषांकात समाविष्ट लेख हे अशाच विचारप्रवृत्त प्रक्रियेचे प्रतिबिंब आहेत. ते केवळ विषय मांडणारे निबंध नाहीत, तर त्या विषयाच्या भोवतालच्या जाणिवा, परंपरा, मूल्यं आणि अनुभव यांचा एका एकात्मतेतून घेतलेला विचार आहेत. हे लेख वाचकाला अंतर्मुख करतात, समजुतीचा नवा पैलू उलगडतात आणि कृतिशीलतेचा नवा उगम निर्माण करतात.

'भारतातील प्राचीन रंगांचा इतिहास' हा लेख केवळ सौंदर्यदृष्टीचा अभ्यास नाही, तर आपल्या सांस्कृतिक परंपरेतील रंगविवेक, अर्थच्छटा आणि ऐतिहासिक जडणघडणीचे दस्तऐवजीकरण आहे. त्याचप्रमाणे, 'शालेय शिक्षण विभाग व माननीय न्यायालय यांचा परस्पर संबंध' या लेखात शिक्षण हा मूलभूत अधिकार कसा न्यायसंस्थेच्या सजगतेने सुरक्षित राहतो, याचा सखोल वेध घेतलेला आहे. शिक्षण आणि कायदा यांचा हा समवेत प्रवास आपल्या लोकशाही मूल्यांना केवळ आधार देत नाही, तर त्यांना न्याय, समानता आणि सशक्तीकरणाची मूळ दिशादेखील दाखवतो.

या सर्व माहितीपूर्ण लेखांचा समावेश या अंकात करण्यात आलेला आहे. यामध्ये केवळ वाचकाला उपयुक्त माहिती मिळणार नाही, तर यातील लेख अंतर्मनाशी संवाद साधण्यास उद्युक्त करतात. या लेखनातून केवळ सत्याचे दस्तऐवजीकरण घडत नाही, तर मानवी जाणिवा आणि सांस्कृतिक आत्मसमीक्षण यांचे एक समृद्ध दर्शन घडते. हे लेख म्हणजे एक वाचनीय अनुभव नाही, तर मनाशी, समाजाशी आणि शासनाशी जोडणारा विचारांचा सेतू आहेत.

या विशेषांकाद्वारे शासनाच्या बाह्य रूपाचे नव्हे, तर त्याच्या अंतर्गत संवेदनशील चेहऱ्याचे दर्शन घडवणारे लेख साकार झाले आहेत. या माध्यमातून वाचक आणि शासन यांच्यातील सुसंवादाची जागा लेखनातून अधिक अर्थपूर्ण होत राहील. 'आपलं मंत्रालय'च्या पुढच्या वाटचालीस खूप शुभेच्छा...

**डॉ. किरण कुलकर्णी**
(अतिथी संपादक)

# चहाचा इतिहास

**डॉ. किरण कुलकर्णी**

अकबराने विचारलेल्या तीन प्रश्नांची उत्तरं बिरबलाने एका शब्दात दिल्याची कथा तुम्हाला माहीत आहेच; पण सकाळी वर्तमानपत्र वाचताना त्याच्यासोबत काय प्यावे लागते? ५:३० पर्यंत ऑफिसमध्ये बसावे लागणार, तेव्हा कंटाळा जाण्यासाठी काय करावे? पावसाळी हवेत कोणते गरमागरम पेय ओठाशी न्यावेसे वाटते? या आणि अशा अनेक प्रश्नांचं उत्तर आहे, 'चहा'!

जगातील सर्वात लोकप्रिय पेय म्हणजे 'चहा' होय. जगातल्या बहुतेक सर्वच देशात पेय म्हणून चहाचा वापर आहे. भारतात शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही प्रकारच्या लोकांमध्ये आदरातिथ्याचा भाग म्हणून चहापानाला महत्त्व आहे.

चहाचे जनकत्व निर्विवादपणे चीन देशाकडे जाते. 'चहा' हा शब्द चिनी भाषेतील 'चा' या शब्दापासून रूढ झाला आहे. चिनी भाषेतून जपान, भारत, इराण आणि रशिया या देशांत याच अर्थाचे शब्द रूढ झाले आहेत. इंग्रजी भाषेतल्या 'टी' या शब्दाचे मूळ आहे चीनमधील ॲमॉय प्रांतातील बोलीभाषेतील 'टे' हा शब्द, व्यापारासाठी जगभर फिरणाऱ्या डच लोकांनी जावा मार्गे हा शब्द युरोपात नेला. इंग्रजी भाषेत अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत चहाला 'टे' हा शब्द रूढ होता. त्यानंतर त्याचा उच्चार 'टी' असा झाला.

चहाचे उगमस्थान चीन देश आहे, याबद्दल वाद नाही. चहाशी संबंधित एक चिनी दंतकथा सांगितली जाते ती अशी. खूप-खूप वर्षांपूर्वी म्हणजे चहाचा शोध लागण्यापूर्वी चीनचा राजा आपले राज्य कुशलतेने सांभाळत होता. आपल्यानंतर आपले राज्य आपला मुलगा कसा सांभाळेल, अशी त्याला नेहमीच काळजी वाटत असे. त्याला एकच मुलगा होता आणि तो होता भलताच झोपाळू! दिवसातील बराच वेळ हा झोपाळू राजपुत्र झोपेतच घालवत असे. त्यामुळे तो नेहमीच सुस्तावलेला दिसत असे. त्याची झोप कमी व्हावी म्हणून राजाने हकीम आणले, मांत्रिक बोलावला; पण उपयोग शून्य!

राजपुत्राला होती अजब सवय, तो नेहमी उकळलेले गरम पाणी पीत असे. थंड पाणी त्याला मुळीच चालत नसे. एके दिवशी राजाच्या आचाऱ्याने राजपुत्राचे पिण्याचे पाणी उकळत ठेवले होते. भांड्यावर नव्हते झाकण! एवढ्यात भरारा जोराचा वारा सुटला आणि खिडकीजवळच्या कोणत्याशा झुडुपाची पाने त्या उकळत्या पाण्यात पडली. त्याच वेळी राजपुत्राला पाणी पाहिजे म्हणून हुकूम झाला. आचाऱ्याने खिडकीजवळच्या झुडपाची पाने पाण्यात पडलेली पाहिली नाहीत. घाईघाईने त्याने पाणी दिले. राजपुत्र पाणी प्यायला आणि काय आश्चर्य? राजपुत्राची झोप खाड्‌कन उडाली की! त्याला खूपच ताजेतवाने वाटू लागले. तो उत्साहाने सगळीकडे फिरू लागला, बोलू लागला.


राजपुत्राचा उत्साह पाहून सगळेच चकित झाले. राजाला खूपच बरे वाटले. राजाने चौकशी केली, कशाचा हा परिणाम? राजपुत्राच्या लक्षात आले की, आपण गरम पाणी प्यायलो, तेव्हापासून आपल्याला झोप नाही. त्याने स्वयंपाक घरात चौकशी केली. आचाऱ्याने पाणी पाहिले. त्यात पडलेली पाने पाहून तो खूप घाबरला, त्याने क्षमायाचना केली; परंतु राजाने त्याला एकदम बढती दिली, बक्षीस दिले. तेव्हापासून थकवा, झोप जाण्यासाठी सर्वच जण तीच विशिष्ट पाने घालून पाणी उकळून पिऊ लागले. ती पाने होती चहाची, अशी आहे चहाच्या जन्माची दंतकथा!

चिनी इतिहासानुसार, चहा अतिप्राचीन काळापासून वापरात आहे. इ.स.पू. २७३७ च्या सुमारास दोन मुंग नावाच्या सम्राटाच्या कारकिर्दीत चहाचा उत्तेजक पेय म्हणून वापर सुरू





झाला. चहाचा अधिकृत उल्लेख 'एर या' या शब्दकोशात आढळतो. इ.स.पू. ३५० च्या सुमारास औषधी गुणधर्म असलेली वनस्पती म्हणून लोकांना चहाची वनस्पती परिचित होती. कालांतराने या चहाच्या वनस्पतीच्या गुणधर्माचे संशोधन होऊन त्यातील फायदे व इतर गोष्टींचे विवेचन केले गेले. चीन, जपान, तिबेट, इराण या देशांमध्ये चहाचा प्रसार झाला. जगात चहा पिण्याच्या वेगवेगळ्या पद्धती रूढ झाल्या.



सतराव्या शतकाच्या सुरुवातीस डच लोकांनी युरोपात प्रथम चहा नेला. हळूहळू युरोपात चहाचा खप वाढू लागला. व्यापारी कंपन्या चहाचा व्यापार करू लागले. त्यानंतर व्यापारात इंग्रजांचे वर्चस्व वाढत गेले. व्यापारी स्पर्धा, सत्ता स्पर्धा, साम्राज्य स्पर्धा यात इंग्रजांनी आपले वर्चस्व निर्माण केले. वसाहती स्थापन केल्या. वसाहतींचा व्यापारात हक्काची बाजारपेठ म्हणून इंग्रजांना फायदा मिळाला. इंग्लंडमध्ये ईस्ट इंडिया कंपनी ही त्या वेळी व्यापारी कंपनी स्थापन झाली होती. इ.स. १६६९ पासून इंग्लंडमध्ये चहाची आयात करण्याची मक्तेदारी ईस्ट इंडिया कंपनीला होती. चीन आणि भारत या देशातून चहा निर्यात करून इंग्लंड आणि अमेरिकेतील वसाहतींमध्ये चहा लोकप्रिय करण्यात ईस्ट इंडिया कंपनीचा वाटा फार मोठा आहे.

इंग्लंडच्या अमेरिकेमधील वसाहतींसंबंधात 'बोस्टन टी पार्टी' ही घटना प्रसिद्ध आहे. इंग्लंडने आपल्या अमेरिकन वसाहतींवर बंधनकारक अटी घातल्या. चहावर कर बसवला.

ईस्ट इंडिया कंपनीकडूनच चहा घेतला पाहिजे असे बंधन घातले. या जुलमाचा निषेध करण्यासाठी अमेरिकन वसाहतींमधील लोकांनी एक योजना आखली. चहाची खोकी भरलेले ईस्ट इंडिया कंपनीचे जहाज अमेरिकेतील बोस्टन बंदरात येऊन पोहोचले. अमेरिकन स्वातंत्र्य योद्ध्यांनी रेड इंडियन लोकांचा पोशाख करून खोकी उतरवण्यासाठी जहाजावर प्रवेश केला. चहाची खोकी बंदरात न उतरवता त्यांनी समुद्रात फेकून दिली. हीच इतिहास प्रसिद्ध बोस्टन टी पार्टी होय. ॲनापलीस बंदरात याचीच पुनरावृत्ती झाली. अमेरिकेतील इंग्लंडची सत्ता संपुष्टात आल्यावर अमेरिकन वसाहतींच्या लोकांनी चहावर बहिष्कार टाकला. त्यांनी कॉफीचा वापर सुरू केला. अद्यापही अमेरिकेत चहाच्या तुलनेत कॉफीचा खप जास्त आहे. गेल्या तीन–चार शतकात जगाच्या राजकीय इतिहासाशी चहा निगडित झाला आहे असा!

भारतात चहाच्या लागवडीला इ.स. १७७८ पासून सुरुवात झाली. त्या काळात इंग्रजी सत्तेचे बस्तान भारतात बसत होते. अनुकूल हवामान पाहून आसाम, नेपाळच्या टेकड्यांमध्ये चहाची लागवड करण्यासंबंधीची शिफारस तत्कालीन इंग्रज गव्हर्नर जनरलकडे करण्यात आली. भारतात चहाची लागवड फायद्याची ठरेल, हे व्यापारी वृत्तीच्या इंग्रजांनी बरोबर ओळखले. इंग्रजांच्या काळात भारतात चहाला अधिक महत्त्व आले. चहाचे मळे इंग्लंडच्या भांडवलावर फुलू लागले. परतंत्र भारताचे मजूर कमी दरात तिथं राबू लागले. स्थानिक कारागिरांचे धंदे इंग्रजांच्या धूर्त व्यापारी नीतीने बसलेले, त्यामुळे इंग्रजांना स्वस्त मजूर आयतेच मिळाले.

भारताच्या हवामानाचे वैशिष्ट्य लक्षात घेऊन चहाची लागवड यशस्वी झाली. चहाच्या पिकाला उष्ण हवामान, भरपूर पाऊस, पाण्याचा निचरा होणारी जमीन आवश्यक असते. त्यामुळे भारतात चहाची लागवड मुख्यत्वे करून उत्तर पूर्व व दक्षिण भारतातील डोंगराळ प्रदेशात केली जाते. भारतातील आसाम हा प्रदेश चहाच्या लागवडीमध्ये प्रथमपासूनच अग्रेसर आहे.

चहाची गुणवत्ता हा एक महत्त्वाचा भाग आहे. एकाच गुणवत्तेचा चहा वर्षभर मिळावा, यासाठी वेगवेगळ्या चहाच्या मळ्यातील चहाचे विशिष्ट प्रमाणात मिश्रण केले जाते. चहाच्या झाडांची विशिष्ट प्रकारे निगा राखली जाते. त्याची प्रतवारी ठरवून चहाची गुणवत्तेनुसार विक्री केली जाते. चहा उद्योग हा भारतातील एक महत्त्वाचा उद्योग झाला आहे.

असा हा चहा! तुम्हा आम्हाला अतिशय आवडणारा!!

**(सचिव, मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन)**



# मा. न्यायालय आणि शालेय शिक्षण विभाग एक आंतर संवाद!

शालेय शिक्षण विभागातर्फे १२ जुलै २०२५ रोजी मा. महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांच्या अध्यक्षतेखाली मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण विभाग) यांच्या पुढाकाराने यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे न्यायालयीन कामकाजाबाबत कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

ही जणू महाराष्ट्र राज्यातील सरकारी वकील, साहाय्यक सरकारी वकील यांच्या टीमबरोबर शालेय शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी, कक्ष अधिकारी, राज्यातील शिक्षण उपसंचालक, शिक्षण अधिकारी, आयुक्त (शिक्षण) कार्यालयातील अधिकारी यांनी केलेली न्यायालयीन साक्षरतेची सफर ठरली. या सफरीत आस्थापना अधिकारी, ताशिलदार सर, उपसचिव यांच्या साथीने श्री. महाजन सर, उप सचिव यांनी मुख्य भूमिका बजावली.




या कार्यशाळेची सुरुवात मा. महाधिवक्ता यांच्या मार्गदर्शनपर भाषणाने झाली. मुळात ही कार्यशाळा शालेय शिक्षण विभागाच्या प्रचंड प्रमाणातल्या न्यायालयीन सुनावण्या, त्यात होत असलेल्या कार्यपद्धतीतील त्रुटी, उडणारे गोंधळ, त्यातून उद्भवणारी न्यायालयाची नाराजी यातून आयोजित करावी लागली. तरी मा. महाधिवक्ता यांनी व्याख्यानाच्या सुरुवातीलाच सरकारी अधिकारी committed, passionate असतात हे अधोरेखित केले, परंतु त्यांनी शासकीय कामकाज करताना ते In accordance with Law so as to sustain it in court of Law हे तत्त्व ध्यानात ठेवून कामकाज योग्य न्यायिक मार्गाने करण्यावर भर देण्याची आवश्यकता विशद केली.

या कार्यशाळेतून गडगंज टपालात जेव्हा कोर्टाची नोटीस दिसते तेव्हा घाम फुटून झोप उडवणाऱ्या नजरेला आज नवा दृष्टिकोन मिळाला तो असा की, नोटीस म्हणजे श्रीमती कांथारिया मॅडम, सरकारी वकील यांनी सांगितल्याप्रमाणे Principal of Natural Justice bm अनुसरून opportunity to hear अशी न्यायालयाने सरकारला किंवा नागरिकाला बहाल केलेली संधी किंवा हक्क असतो हे उमजले. श्रीमती भिडे मॅडम, सरकारी वकील यांनी न्यायालय आणि प्रशासन यात कम्युनिकेशनला असणारे अनन्यसाधारण महत्त्व, न्याय प्रक्रियेत effective representation साठी गरजेचे असल्याचे सांगितले. त्यासाठी ई-मेल, व्हॉट्सॲप यांच्या माध्यमातून सरकारी वकिलांशी संपर्क, अधिकाऱ्यांची बदली झाल्यास याबद्दल न्यायालयास कळवणे इ. साधे पण महत्त्वाचे प्रक्रियात्मक उपाय सुचवले.

श्री. गिरासे सर, सरकारी वकील यांनी व्याख्यानाची सुरुवात सरकारकडून वेळीच Reply फाईल का होत नाही आणि त्यावरून त्यांची न्यायालयातच शाळा कशी घेतली गेली याचा स्वानुभव मिश्कीलपणे कथन करून केली. त्याच संदर्भाने रिप्लाय वेळीच फाईल करण्याची गरज आणि त्यासाठी Digital diary, नोडल ऑफिसर नेमणूक, contempt डेटा रजिस्टर ठेवण्याबाबत त्यांनी धोरणात्मक उपाय सुचवले. श्रीमती कल्याणी मॅडमने Power of Review वर भाष्य केले, तर श्रीमती पेंडसे मॅडमने Reimbursement प्रकरणातल्या समस्या व उपाय विशद केले.

व्याख्यानाचे दुसरे सत्र व्याख्याते आणि क्षेत्रीय अधिकारी यांच्या आंतरसंवादाने रंगले. यात शालेय शिक्षण विभागातील महत्त्वाच्या न्यायालयीन प्रकरणांचे विषय जसे TET प्रक्रिया, विना अनुदानितमधून अनुदानित संस्थेत बदली, अनुकंपा नियुक्ती, reinstate व प्रतिपूर्ती, अल्पसंख्याक संस्थांमधील प्रकरणांची हाताळणी करताना कुठल्या milestone न्यायालयीन केसेसचे संदर्भ कसे द्यावेत आणि त्यावरून affidavit बळकट करावे, याबाबत अत्यंत सखोल मार्गदर्शन केले. असे प्रशासन आणि न्यायप्रक्रिया या लोकशाहीच्या चारपैकी दोन खांबांचे समग्र विचारमंथन होत असतानाच सभागृह जागते राहावे, म्हणून श्री. सामंत सर, सरकारी वकील त्यांच्या विनोदी शैलीने सभागृहातील ताण कमी करतच होते. व्याख्यानं संपल्यावर प्रश्नोत्तरे चांगलीच तासभर चालली की, महाजन सर, उपसचिव तथा चर्चासत्राचे समन्वयक यांना माईक गायब करायचे सकारात्मकदृष्ट्या विनोदी अंगाने फर्मान काढावे लागले. या चर्चासत्रात क्षेत्रीय अधिकारी त्यांना येणाऱ्या समस्या हिरिरीने मांडत होते आणि सरकारी वकीलदेखील त्यांना समर्पक उत्तरे देऊन शंकानिरसन करत होते. या सर्व चर्चा-मंथनातून सरकारी वकिलांनी लवकरच ते शालेय शिक्षणाशी संबंधित महत्त्वाची न्यायिक प्रकरणे व आजवरचे त्याबाबत न्यायालयाने दिलेले मार्गदर्शनपर उल्लेखनीय निर्णय याचा डेटा बँक अधिकाऱ्यांना उपलब्ध करण्यात येईल, अशी ग्वाही दिली. अशा रितीने अधिकारीवर्गाची न्यायव्यवस्थेने एकतर्फी घेतलेली ही कार्यशाळा न राहता एकंदरीत हा प्रशासन आणि न्याय व्यवस्थेचा महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेला पहिला आंतरसंवाद ठरला. ज्याने शालेय शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना न्यायव्यवस्थेचे गमभन शिकवतानाच न्यायव्यवस्था प्रशासनावर केवळ ताशेरे मारायला नसून प्रशासनास बळकटी द्यायला कशी साहाय्यभूत ठरू शकते, असा विश्वास मिळाला आणि ही कार्यशाळा जणू मा. न्यायालयाच्या सोबतीने शालेय शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आयोजित केलेली एकदिवसीय यशस्वी शैक्षणिक सहल ठरली.

**- डॉ. स्नेहा चुरी, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन**

**विनायक इंगळे**


# पावसाळ्यातील सर्व्हिसिंग

## वाहनांची नाही, आपली..!

पावसाळ्याला सुरुवात झाली आणि काही दिवसांनी कारच्या सर्व्हिसिंगसाठी आठवण करून देणारे संदेश मोबाइलवर येऊन धडकले. मग या शनिवारी की पुढच्या शनिवारी असं करत मग बघू नंतर असं ठरवलं. कारण तसेही मागच्या वेळच्या सर्व्हिसिंगनंतर १०,००० किलोमीटर झालेले नव्हते व एक वर्षदेखील पूर्ण झाले नव्हते. त्यात प्रमोशननंतरच्या अनिवार्य अशा दोन आठवड्यांच्या उजळणी प्रशिक्षणासाठी जावे लागले. मग आपोआपच कार व मोटारसायकलच्या देखभाल दुरुस्तीचा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला. उजळणी प्रशिक्षण घेऊन आल्यावर पुन्हा नेहमीचं ऑफिस सुरू झाले. आमच्या अगोदर जे मित्र मंडळी प्रशिक्षण घेऊन आले होते त्यांनी ट्रेकिंगला जाण्याचा विचार बोलून दाखवला. मी जरा अधिकच सामाजिक प्राणी असल्याने, याबाबत इतर सहकाऱ्यांनादेखील या पायी गडभ्रमंतीसाठी येण्याचे आवाहन केले. ग्रुप असेल तर भरपूर मजा येणार याची खात्री होतीच; पण काहींना घरून परवानगी मिळणे कठीण वाटत होते, तर काहींना पूर्वनियोजित कामे होती. असे करत शेवटी ११ लोक येणार असं ठरलं, त्यातही प्रत्यक्षात ८ उत्साही सदस्यच येऊ शकले.

सर्वजण वयाच्या पस्तीशीच्या पुढचे असूनही १५-२० वर्षे मागे जाऊन महाविद्यालयीन तरुणांच्या उत्साहात या सहलीत सहभागी झाले. सकाळी, खरंतर भल्या पहाटे आवरून ५ - ५.३०ची लोकल ट्रेन पकडून मार्गस्थ झाले. सर्वांत जवळ मीच राहत असल्याने मला नेहमीच्या वेळी ६ वाजेपर्यंत झोप पूर्ण करण्याची चैन परवडणार होती. शिवाय सर्वांसाठी गरमागरम नाष्टा घेऊन यायची जबाबदारी माझी होती. मग आम्ही सर्व एकत्र आलो, पटपट नाष्टा केला व मोबाइलवर मॅप सुरू करून प्रबळगडाच्या दिशेने कूच केली. या गडाबद्दल थोडी माहिती घेण्यासाठी यु-ट्यूबवर १-२ व्हिडीओ आदल्या दिवशीच पाहिले होते. एकूणच मनाची पूर्वतयारी पूर्ण झाली होती. बऱ्यापैकी नियोजन करून पाऊस येणार हे गृहीत धरून आम्ही निघालो. गाडी पार्किंगमध्ये होती व पाठीवरच्या सॅकमध्ये काय आवश्यक गोष्टी घ्यायच्या हे ठरवत असतानाच पावसाच्या सरींनी आमचं स्वागत केलं. मग आणिबाणीच्या परिस्थितीसाठी रेनकोट, छत्री, मोबाइलसाठी पॉलिथीनची पिशवी इ. सर्व जय्यत तयारी उपयोगी पडली. शिवाय स्पोर्ट्स शूज आम्ही आधीच अनिवार्य केले होते. त्यामुळे दगड किंवा निसरड्या वाटेवरून जाताना तुलनेने आधार वाटत होता.

आम्ही छानपैकी भरपेट नाष्टा करून निघालो असल्याने, शिवाय सोबत काही खाद्यपदार्थ व पाणी घेतलं असल्याने निश्चिंत गडावर जात होतो; पण हे काही आपलं विशिष्ट टार्गेट नव्हतं. निसर्ग पर्यटनाचा पुरेपूर आनंद घ्यायचा एवढं आपलं धोरण होतं. दुपारपर्यंत गड उतरून खाली यायचं ठरलं होतं; पण थेट गडावर जाऊनच विश्रांती घ्यायची किंवा फोटो काढायचे असं काही नव्हतं. म्हणून आम्ही प्रत्येक टप्प्यावर अगदी थोड्या अंतरावरदेखील यथेच्छ फोटो काढले. यात अगदी उत्साहाने स्वतःच्या मोबाइलमध्ये अथकपणे इतरांचे फोटो काढणारा हौशी मित्र आमच्या ग्रुपमध्ये होता. म्हणूनच या आठवणी साठवून ठेवणं शक्य झालं. निसर्गाला आपलंसं करायचं असेल, समजून घ्यायचं असेल, तर निसर्गाच्या सान्निध्यात काही काळ तरी राहायला हवं. सर्व प्रकारच्या भेसळीपासून मुक्त असलेले निसर्गाचे शुद्ध रूप म्हणजे डोंगर, झरे व जंगलातील सजीव..! ऑफिसमध्ये संगणक, प्रवासात मोबाइल व घरी टीव्ही यांच्या स्क्रीनवर सतत काहीतरी पाहून डोळे कंटाळून जातात. अशावेळी इवल्याशा गवतापासून तर उंचच उंच वाढलेली किंवा विस्तीर्ण पसरलेली हिरवीगार झाडं डोळ्यांना व मनाला भुरळ घालतात, आपला थकवा दूर करतात. प्रेमात पडायला लावणारा हा निसर्ग खरंच अप्रतिम आहे.



आम्ही ट्रेकिंग सुरू करून काही मिनिटेच झाली होती, तर एक तरुणांचा गट आमच्याबरोबर दिसला. मग आम्ही त्यांचे ग्रुप फोटो काढून दिले तसेच त्यांच्याकडून आमचेदेखील फोटो काढून घेतले. पुढे गेल्यावर वर्दीतील वन विभागाचे कर्मचारी आमच्याकडे बघून एकमेकांशी बोलताना दिसले की, हे एमपीएससी-यूपीएससी करणारे विद्यार्थी असतील. तेव्हा आम्हाला एमपीएससीमधून निवड होऊन १० वर्षे

होऊन गेली, तरीही लोकांना आम्ही विद्यार्थी वाटतो, ही बाब मनोमन सुखावून गेली. मग आम्ही आणखी उत्साहात पुढे-पुढे जात राहिलो. एक खळाळता झरा दगडाला तोडून लहानसा धबधबा बनला होता. आमच्या ट्रेकची सुरुवात होती मग येथे भिजायचे की नाही या द्विधा मन:स्थितीत मी होतो. अशावेळी जराही वेळ न दवडता लहान मुलांच्या उत्साहात आमच्या ग्रुपच्या दोघींनी आपले अधिकचे दोन दोन डोळे (चष्मा) आमच्याकडे देऊन स्वतःला अक्षरशः पाण्याच्या स्वाधीन केले. मी कित्येकदा शनिवारी व रविवारी सकाळची अंघोळ उशिरा करतो व मस्तपैकी शॉवर सुरू करून थंड पाण्याचा आनंद घेतो. मात्र येथे निसर्गात डोंगराच्या कुशीत एवढं छान शॉवर उपलब्ध होतं की, नुसतं येथे १-२ तास बसून राहिलो तरी येण्या-जाण्याचा वेळ वसूल झाला असं समजायला हरकत नाही. धबधब्यात भिजण्याचा आनंद इतरही सदस्यांनी घेतला. आताच नको भिजायला, येताना भिजू असा विचार करून तेथे काही पोज देऊन फोटो काढून मी पुढे निघालो. दगड, माती, पाऊलवाट असे एक-एक करत भरपूर चालून गेल्यावर आम्हाला वाटले आता गड आला; पण आम्ही जेथे पोहोचलो ती प्रबळगडाची माची होती. गड तर त्यानंतर सुरू होणार आहे असं समजलं. मग आपण येथूनच गडाला नमस्कार करून परत फिरायला पाहिजे असे वाटले, तर आमच्यातील एका हुशार मित्राने सांगितलं की, आपण केवळ थोडं अंतर पुढे धबधब्यापर्यंत जाऊ मग तेथे थोडं भिजून परत येऊ. मग हे सर्वांना पटलं व आम्ही पुढे निघालो; पण असा धबधबा शेवटपर्यंत आलाच नाही....! अजून थोडे पुढे, अजून थोडे पुढे असं करत-करत आम्ही गडाच्या माथ्यावर पोहोचतो..!!



आम्ही गडाकडे जात असताना आमच्या मागे व पुढे ट्रेकिंग करत असलेले भरपूर लोक भेटत होते. यात ८-१० वर्षांच्या मुलांपासून, तर सेवानिवृत्त आजोबांपर्यंत विविध वयोगटातील ट्रेकर्स होते. मध्ये-मध्ये परतीच्या वाटेवर असलेले लोक भेटायचे आणि गमतीची गोष्ट म्हणजे आम्ही त्यांना विचारले की, अजून किती वेळ लागेल तर ते दीड तास लागेल म्हणून सांगायचे. बरं अर्ध्या तासापूर्वीदेखील एका गटाने दीडच तासांचा वेळ सांगितला असताना अजूनही तेवढाच वेळ लागेल असं ऐकलं की, आपला वेग फारच कमी असल्याचे एकमेकांना सांगत आम्ही पुढे जात होतो. अशा गमतींसोबतच काळजाचा ठोका चुकवणारे काही सेकंददेखील या प्रवासात आले. डोंगराच्या कपारीत अतिशय चिंचोळी जागा आम्हाला ओलांडून जावी लागली. आम्ही ती ४-५ फूट लांबीची व ६-७ इंच रुंद जागा पार करताना अतिशय सावधगिरी बाळगली होती! पाऊस सुरू असल्याने काहीसा निसरडा मार्ग, एका हाताला एका मोठ्या दगडाचा आधार व दुसरा हात आधाराच्या शोधात असे प्रसंगदेखील काही ठिकाणी आले. आम्ही एकमेकांना हात देत, टीप्स देत, प्रोत्साहन देत; तसेच चेष्टा मस्करी करत अवघड-सोप्या वाटेने पुढे-पुढे चालत होतो. आमच्यापैकी बहुतेकांनी या अगोदर ट्रेक केलेला होता, शिवाय या ट्रेकिंगच्या मार्गावर मोठ्या दगडावरील दिशादर्शक बाणांच्या खुणा जागोजागी उपयोगी पडल्या. यासोबतच काही ठिकाणी चुकीची फूलीदेखील दिसली, त्यायोगे त्या दिशेने जायचे नाही हे समजले. ट्रेकिंगच्या सुरुवातीपासून तर थेट गडाच्या माथ्यापर्यंत संपूर्ण प्रवासात अनेक ठिकाणी खाद्यपदार्थ, चहा, लिंबू सरबत इ. चे उपाहारगृह जागोजागी उपलब्ध होते.

या सर्व प्रवासात आमच्या शरीराची व मनाची तपासणी होत होती. डोळ्यांनी पाहून तर्कशुद्ध विचार करून आम्ही पुढचे पाऊल सुरक्षित कसे ठेवायचे याचा वेगाने निर्णय घेत होतो. अशावेळी आपल्या शरीरातील सर्व स्नायू व हाडे मजबूत आहेत ना याची खात्री करता येत होती. आपलं हृदय आणि फुफ्फुसे सक्षम आणि तरुण आहेत हे ट्रेकिंग करताना सिद्ध होते, त्यासाठी वेगळी चाचणी घेण्याची गरज नाही. आजूबाजूच्या वृक्षांचे अस्तित्व व वातावरण यामुळे आपल्याला किती प्रसन्न वाटते यावरून आपल्यातील संवेदना किती जागृत आहेत हे लक्षात येते. मानवनिर्मित वाद्यांतून येणाऱ्या संगीताचा आवाज एकीकडे आणि खळाळता झरा एकीकडे...! प्रक्रिया करून फिल्टर केलेले बाटलीबंद पाणी एका बाजूला व नैसर्गिक मिनरल असलेले झऱ्याचे नितळ पाणी एका बाजूला...! महत्त्वाचे म्हणजे हे सर्व अगदी विनामूल्य..! या दातृत्वाची क्षमता केवळ निसर्गातच आहे.

आपण वाहनांची सर्व्हिसिंग करतो तेव्हा सगळी स्वच्छता करणे, ऑईल बदलणे, इ. गोष्टी करून वाहनाला सुयोग्य केले जाते. तसेच आयुर्वेदात जे पंचकर्म उपचार केले जातात, त्यांचा उद्देश शरीरातील अपायकारक व अशुद्ध असे साचलेले घटक बाहेर काढणं हाच असतो. याचप्रमाणे ट्रेकिंग व निसर्ग पर्यटनाचा शरीर व मनासाठी फायदा होतो. मनात कोणत्याही नकारात्मक भावना, भीती, चिंता, काळजी, टेंशन, द्वेष, राग, चिडचिड इ. साचलेले असलेच, तर निसर्गाच्या सान्निध्यात जसं पाण्याचं वाफेत व वाफेचं पाण्यात रूपांतर होतं, तसंच नकारात्मक गोष्टींचं सकारात्मक गोष्टींत रूपांतर होतं. धुकं पाहताना, दीर्घ श्वास घेत दोन्ही हात खांद्याला समांतर पसरवून धुकं अनुभवताना निसर्गापुढे नतमस्तक व्हावे वाटते. आपली स्वतःसोबत व निसर्गासोबत मैत्री घट्ट करायची असेल, शरीर, मेंदू, भावना यांची सर्व्हिसिंग करून ताजेतवाने व्हायचे असेल, तर दरवर्षी किमान १-२ वेळा तरी ट्रेकिंगला अवश्य जायला हवं. स्वतःला चिरतरुण ठेवायचं हे एक प्रभावी माध्यम आहे.

**(कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन.)**

# टाटा : परीसस्पर्श

**अतुल नरहरी कुलकर्णी**

मी नियोजन विभागात साहाय्यक कक्ष अधिकारी पदावर कार्यरत असताना २८ जुलै २०१४ रोजी हा परीसस्पर्श मला लाभला. त्याचे झाले असे की, नियोजन विभागात सीएसआर (Corporate Social Responsibility) अंतर्गत टाटा कंपनीचे शासकीय प्रकल्पांना साहाय्य प्राप्त करण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली Core Group Committee स्थापन करण्यात आली होती. त्या समितीवर शासनाच्या विविध विभागांचे सचिव व स्वतः रतन टाटा आणि टाटा कंपनीचे विविध विभागांचे मुख्य कार्यकारी अधिकारी सदस्य होते. या समितीची बैठक २८ जुलै २०१४ रोजी सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीची सूचना शासकीय पद्धतीने आमच्या कार्यासनाच्या लिपिकाने निर्गमित केली. परंतु मी टाटा कंपनीचे समन्वयक श्री. तेरकर यांच्याकडून सदस्य असलेल्या सर्व टाटा कंपनीचे विविध विभागांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे ई-मेल आयडी मिळवले. मला खुद्द रतन टाटा यांचा ई-मेल आयडी मिळाला. त्यामुळे मी या बैठकीची सूचना सर्वांना ई-मेल केली. आता माझ्या मनात उत्सुकता होती ती, रतन टाटा यांना पाहण्याची... त्यांना ऐकण्याची !



अतिथीगृह येथे बैठकीच्या नियोजित वेळेच्या एक तास आधीच पाहोचून आम्ही बैठक व्यवस्था चोख लावली. मुख्य सचिव समितीचे अध्यक्ष असल्याने ते केंद्रस्थानी अध्यक्षाच्या खुर्चीवर बसतील, असा माझा समज होता, परंतु अध्यक्षाच्या खुर्चीवर कोणीच बसले नाही. टेबलाच्या एका बाजूला मध्यभागी मुख्य सचिव, त्यांच्या दोन्ही बाजूंना विविध विभागांचे सचिव यांची बसण्याची व्यवस्था केली होती. टेबलाच्या दुसऱ्या बाजूला मुख्य सचिव यांच्यासमोर मध्यभागी रतन टाटा व त्यांच्या दोन्ही बाजूंना टाटा कंपनीचे विविध विभागांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची बसण्याची व्यवस्था केली होती. ही खरी संवाद साधण्यासाठीची बैठकरचना! सर्वजण समान पातळीवर....

'ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांच्यासोबतच्या बैठकीत लक्षात राहिलेला क्षण म्हणजे, पर्यटन विभागाच्या सचिवांनी कोकणमध्ये फिरते वा तरंगते सप्ततारांकित हॉटेल बांधण्याची व पर्यटनाला चालना देण्याची डोळे दिपवून टाकणारी योजना मांडली. त्यामध्ये टाटांचे सहकार्य अपेक्षिले. त्यावर रतन टाटा म्हणाले, 'कोकणमध्ये युवकांना इंग्रजी बोलायला येत नाही. तिथे जर परकीय पर्यटक आले, तर त्यांना इंग्रजीमधून माहिती सांगण्याकरिता स्थानिक युवकांना इंग्रजी शिकवणे यांसारख्या मूलभूत गोष्टींकडे लक्ष द्यायला हवे.' इतका यशस्वी माणूस पण अजूनही जमिनीशी नाते सांगणारा... मूलभूत बाबींचा विचार करणारा... बैठकीची वेळ सकाळी १०.३० ची होती. बैठकीसाठी सर्वजण वेळेवर हजर होते; पण माझी नजर ज्यांना शोधत होती, ते रतन टाटा मात्र आले नव्हते. त्यांच्या सीईओंनी सांगितले की, ते ट्राफिक जाममध्ये अडकलेत. अर्थात ते आल्याशिवाय बैठक सुरू झाली नाही. बरोबर ११.०० वाजता ते आले. त्यांनी बैठकीच्या हॉलमध्ये पाय ठेवताच सर्वजण आदराने उभे राहिले. टाटांनी मात्र बैठकीसाठी अर्धा तास उशीर झाल्यामुळे सर्वांची माफी मागितली. ते आपणाला साहजिकच वाटेल, परंतु महान माणसाची महानता, विनयशीलता, नम्रता याचा प्रत्यय त्या दिवशी आला. कारण मुख्य सचिवांनी सर्वांचे स्वागत करून बैठकीची प्रस्तावना केली आणि रतन टाटा यांनी बोलायला सुरुवात केल्यानंतर पुन्हा एकदा बैठकीस अर्धा तास उशीर झाल्यामुळे माफी मागितली. प्रत्यक्षात त्यात त्यांची काहीच चूक नव्हती, ते वेळेवरच निघाले होते, परंतु मुंबईच्या ट्रॅफिकमुळे ते वेळेवर पोहोचू शकले नाहीत; परंतु उच्च मूल्यांची व्यावसायिकता अंगी भिनलेली असल्याने न झालेल्या चुकीची माफी मागण्याचे औदार्य त्यांच्याकडे होते, तेसुद्धा समोरचा पक्ष शासन असताना!!

रतन टाटा केवळ चारच वाक्य बोलले आणि सर्व धुरा विविध क्षेत्रांच्या त्यांच्या पीएकडे सोपवली. त्यांचे शिक्षण क्षेत्राचे सीईओ यांनी बोलायला सुरुवात केली आणि ते जे बोलले, त्यामुळे मला हर्षवायूच झाला. ते म्हणाले की, 'Now Government is moving fast. First time in history we got an email from Government' बैठकीची सूचना मी ई-मेल केल्याची माझ्या उपसचिवांना कल्पना होती, त्यांनी माझ्याकडे पाहून एक स्मित केले. इतकी साधी व छोटी गोष्ट; पण तीसुद्धा यापूर्वी कोणी अमलात आणली नव्हती आणि त्याचे टाटांच्या सीईओकडून कौतुक होते आहे. आपण त्या गोष्टीचे पायोनिअर ठरलो, याचे मला खूप अप्रूप वाटले.

शिक्षण, ग्रामविकास, नगरविकास, सार्वजनिक आरोग्य अशा विविध विभागांचे सचिव आपल्या योजना मांडत होते व त्यामध्ये टाटा कंपनी कशी सहकार्य करेल याची चाचपणी करीत होते. या चर्चेमध्ये एक जाणवले की, रतन टाटा कंपनीचे प्रमुख असून ते स्वतः अत्यंत मोजके बोलत होते. सर्व सीईओंना बोलण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होते. सर्वात लक्षात राहिलेला क्षण म्हणजे, पर्यटन विभागाच्या सचिवांनी कोकणमध्ये फिरते/तरंगते Seven Star Hotel बांधण्याची व पर्यटनाला चालना देण्याची डोळे दिपवून टाकणारी योजना मांडली आणि त्यामध्ये टाटांचे सहकार्य अपेक्षिले. त्यावर रतन टाटा म्हणाले की, 'कोकणमध्ये युवकांना इंग्रजी बोलायला येत नाही. तिथे जर परकीय पर्यटक आले तर त्यांना इंग्रजीमधून माहिती सांगण्याकरिता तेथील स्थानिक युवकांना इंग्रजी शिकवणे यासारख्या मूलभूत गोष्टींकडे आपण लक्ष द्यायला हवे.' इतका यशस्वी माणूस; पण अजूनही जमिनीशी नाते सांगणारा... मूलभूत बाबींचा विचार करणारा... खरेच टाटा कुटुंबाचे देशासाठी असणारे योगदान विचारात घेता, त्याचे कारण या त्यांच्या विचारसरणीत सापडते. बैठक संपल्यानंतर तत्कालीन मुख्य सचिव श्री. सहारिया यांनी रतन टाटांना फोटो सेशनसाठी विनंती केली. बैठकीस उपस्थित सर्वांशी त्यांनी आनंदाने हस्तांदोलन करून फोटो दिले. मला परीसस्पर्श घडला. या स्पर्शातून माझ्या विचारसरणीचे सोने मात्र नक्की झाले.

आपलं मंत्रालय नोव्हेंबर २०१८ मधून पुनर्मुद्रित.

**(अवर सचिव, महाराष्ट्र शासन)**

# देवनागरी भाग-३

**अजय भोसले**

## मराठी भाषा


लिपीचा अभ्यास करताना प्रथमत: भाषा व लिपी यातला फरक समजून घेणे आवश्यक आहे. आपण ज्या चिन्हांद्वारे भाषा व्यक्त करतो, ती चिन्हं म्हणजे लिपी होय, तर आपण जी भाषा बोलतो ती भाषा म्हणजे मराठी होय. मराठी ही भारतात सर्वाधिक बोलली जाणारी तिसरी तर जागतिक १५ वी भाषा आहे. ज्या देवनागरी लिपीत आपण मराठी लिहितो, त्या मराठी भाषेला अलीकडेच अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. अभिजात दर्जा म्हणजे भाषेची प्राचीनता, भौतिकता आणि सलगता, भाषिक आणि वाङ्मयीन परंपरेचे स्वयंभूषण, प्राचीन भाषा व तिचे आधुनिक रूप यांच्यात पडू शकणाऱ्या खंडासह जोडले असलेले नाते हे निकष पूर्ण करणारी भाषा प्राचीन महारठ्ठी, मरहट्ठी भाषा, महाराष्ट्री प्राकृत भाषा, अपभ्रंश मराठी भाषा आणि आजची मराठी भाषा असा मराठी भाषेचा प्रवास असल्याचे अभिजात भाषा अहवालात नमूद आहे. मराठीतला आज उपलब्ध असलेला गाथासप्तशती हा ग्रंथ सुमारे २००० वर्षे जुना आहे. मराठी भाषेतील पहिला शिलालेख २२२० वर्षांपूर्वीचा असून, ब्राह्मी लिपीतील हा शिलालेख पुणे जिल्ह्यातील जुन्नर जवळच्या नाणेघाट येथे आहे. शिलालेख, ताम्रपट, पोथ्या, हस्तलिखिते यातून भाषेची जपणूक झाली आहे. अभिजात भाषा अहवालात अशा ३० कोरीव लेखांची नोंद आहे. ब्राह्मी लिपीपासून देवनागरी लिपीचा विकास रंजक आहे. ट, ठ, प, र अशी ब्राह्मी लिपीतील अक्षरे पटकन ओळखू येतात. अनेक अक्षरे आपण आज जशी लिहितो त्याला उत्क्रांतीचा इतिहास आहे. आज ब्राह्मी लिपीचे आधुनिक स्वरूप म्हणजे देवनागरी लिपी. देवनागरी लिपी लिहिताना स्वर, व्यंजन, विरामचिन्हे, अंक याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. तथापि सर्वात महत्त्वाचा आहे तो सराव. उभी रेषा, आडवी रेषा, व्रक रेषा यांच्या आकृत्यांचा सराव खालील चित्रात दिला आहे.

(अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.)




गणेशाय
नमः


रक्षाबंधन
धागा प्रेमाचा


ध्येय
निश्चित
असावे...


सदा सर्वदा
योग
तुझा घडावा


सुख म्हणजे
सुख
असतं...


मन



# भारतातील प्राचीन रंगांचा इतिहास!!

**युवराज पाटील**

दोन वर्षांपूर्वी प्राचीन कला आणि स्थापत्य या विषयात शिक्षण घेतले.. त्यावेळी जे रंग प्राचीन भारतात निर्माण झाले, ते नैसर्गिक रंग होते. त्यात प्रामुख्याने पितळखोरे आणि अजिंठा लेण्यातील रंगांवर अधिक अभ्यास केला होता. हा रंगांचा इतिहास शिकल्यानंतर लेण्या बघायला गेलो, त्यावेळी नवीन डोळे आल्या सारखे झाले... त्या रंगांचा इतिहास तुम्हालाही कळावा म्हणून हा धांडोळा...!!

भारतीय उपखंडातील लेण्या म्हणजे केवळ दगडात कोरलेल्या गुहा नाहीत, तर त्या रंगरूपाने नटलेल्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि कलात्मक परंपरेचे साक्षीदार आहेत. विशेषतः अजिंठा आणि पितळखोरे लेण्या या केवळ स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने नव्हे, तर चित्रकलेच्या दृष्टिकोनातूनही जगप्रसिद्ध आहेत. या लेण्यांतील भित्तिचित्रे केवळ सौंदर्यासाठी नव्हे, तर धर्म, इतिहास आणि लोकजीवनाचे चित्रण करणारी आहेत. यामध्ये वापरलेले रंग हे पूर्णपणे नैसर्गिक असून त्यांची रचना, टिकाऊपणा आणि सौंदर्य यामुळेच आज हजारो वर्षांनंतरही ती चित्रे ताजी वाटतात.

लेण्यांमधील रंगकाम हे प्राचीन भारताच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचे आणि कलासंवेदनशीलतेचे प्रतीक आहे. या रंगांमध्ये मुख्यत्वे खनिज, वनस्पतीजन्य आणि जैविक घटकांचा वापर करण्यात आला होता. उदाहरणार्थ, पांढऱ्या रंगासाठी चुनखडी, काळ्यासाठी झाडांचा कोळसा किंवा काळी माती, लाल व तपकिरी रंगासाठी लोहयुक्त खनिज (हेमाटाईट), पिवळ्यासाठी मातीतील ऑकर, हिरव्यासाठी तांब्याचे खनिज मालाकाइट, तर निळ्या रंगासाठी दुर्मीळ लॅपिस लॅझुली वापरण्यात आले होते. लॅपिस लॅझुली हा रंग अफगाणिस्तानातून आयात करण्यात येत असे, यावरून त्या काळातील व्यापारी आणि सांस्कृतिक देवाणघेवाण किती व्यापक होती हे स्पष्ट होते.

अजिंठा लेण्या (इ.स.पू. दुसरे शतक ते इ.स. सहावे शतक) या भारतातील सर्वात प्रसिद्ध भित्तिचित्र असलेल्या बौद्ध लेण्या आहेत. येथील चित्रांमध्ये बुद्धाच्या जातककथा, राजदरबारी प्रसंग, नाट्यमय दृश्ये आणि सामान्य जनजीवन यांचे जिवंत चित्रण आहे. या चित्रांसाठी टेम्पेरा शैली वापरण्यात आली असून, भिंतीवर आधी चिकणमातीचा थर दिला जात असे, त्यावर चुन्याचा मुलायम थर असायचा आणि









त्यावर ओलसर अवस्थेत नैसर्गिक रंग वापरून चित्रे रेखाटली जात. यामुळे चित्रातील रंग खोल, भव्य आणि दीर्घकाळ टिकणारे झाले. यातील काही चित्रांमध्ये लॅपिस लॅझुलीसारखा निळा रंग वापरण्यात आल्याचे वैज्ञानिक विश्लेषणातून सिद्ध झाले आहे, जो त्याकाळी अत्यंत मौल्यवान मानला जात असे. अजिंठा लेण्या युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत १९८३ मध्ये समाविष्ट करण्यात आल्या.

पितळखोरे लेण्या या संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यात चाळीसगाव (जळगाव जिल्हा) पासूनही जवळ आहेत. त्या अजिंठा लेण्यांइतक्याच प्राचीन आहेत. इ.स.पू. दुसऱ्या शतकात सातवाहन काळात या लेण्यांचे निर्माण झाले. येथेही काही भित्तिचित्रांचे अवशेष आढळतात. या चित्रांमध्ये गडद लाल, तपकिरी, काळा आणि पांढरट रंगांचे अवशेष आजही दिसतात. चित्रांचे प्रमाण जरी मर्यादित असले तरी त्या चित्रांमधून सातवाहनकालीन रंगपरंपरेचा मागोवा घेता येतो. काही अभ्यासकांच्या मते, पितळखोरेची रंगपरंपरा पुढे अजिंठ्यापर्यंत विकसित झाली, म्हणजे अगोदर पितळखोऱ्यात ही भितीचित्र काढली गेली. येथील रंगकामातही नैसर्गिक खनिज आणि वनस्पतीजन्य रंग वापरण्यात आले होते, जे टिकाऊ होते.

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग आणि युनेस्को यांनी वेळोवेळी केलेल्या अभ्यासातून हे स्पष्ट झाले आहे की अजिंठा व पितळखोरे येथील रंग नैसर्गिक पद्धतीने तयार करण्यात आले होते आणि त्यामागे रसायनशास्त्राचे, रंगशास्त्राचे ज्ञान होते. वॉल्टर स्पिंक यांच्यासह अनेक आंतरराष्ट्रीय संशोधकांनी अजिंठा लेण्यांवर सखोल संशोधन करून हे दाखवून दिले आहे की, त्या काळातील भारतीय कलाकार जागतिक दर्जाचे रंगनिर्माते व चित्रकार होते.

आज जेव्हा आपण अजिंठा व पितळखोरेतील भित्तिचित्रांकडे पाहतो, तेव्हा केवळ रंगीत चित्रे दिसत नाहीत, तर त्यामागील एक संपूर्ण जीवनदृष्टी, सांस्कृतिक समृद्धी आणि वैज्ञानिक वारसा जाणवतो. हे रंग केवळ भिंतींवर नाहीत, तर आपल्या इतिहासाच्या कपारीत कोरलेले आहेत – टिकणारे, बोलके आणि प्रेरणादायी.

हे पाहताना मनातून वाटतं, जगाला ज्या वेळी रंगाचीही ओळख नव्हती त्या वेळी आपल्या इथे कोरलेल्या लेण्यांवर तत्कालीन शास्त्रशुद्धतेने रंगांतून चित्रे काढली जात आणि आज दोन हजार वर्षांनंतरही दिसतात... हे फक्त अभिमानास्पद नव्हे, तर अलौकिकही वाटणारे आहे.

**(जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव.)**



# महाराष्ट्र धर्माच्या सांस्कृतिक वाटचालीची वारी

**हेमंतकुमार चव्हाण**

राज्याला भक्ती संप्रदायाची मोठी परंपरा आहे. संत ज्ञानेश्वरांपासून सुरू झालेली ही परंपरा पुढे संत एकनाथ, जगद्गुरू संत तुकाराम, संत निळोबा, संत गोरा कुंभार, संत सावता माळी, संत चोखामेळा यांनी अखंड चालवली. याच भक्ती परंपरेतून जन्म झाला तो पंढरपूरच्या वारी परंपरेचा. वारीची परंपरा संत ज्ञानेश्वर महाराजांपासून सुरू झाली आणि पुढे जगद्गुरू संत तुकाराम महाराजांनी त्याला भव्य स्वरूप प्राप्त करून दिले. आषाढी वारीनिमित्त पांडुरंगाच्या दर्शनाला पायी चालत जाण्याच्या या परंपरेला वारी असे म्हणतात. आजही महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेश राज्यातून मोठ्या प्रमाणावर वैष्णवजन आषाढी वारीला येतात.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी सर्वात प्रथम पालखीतून पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनाला जाण्याची प्रथा सुरू केल्याचे मानले जाते, तर त्यानंतर तुकाराम महाराजांनी या प्रथेला मोठे स्वरूप देताना त्यामध्ये सर्वसमावेशकता आणली. त्यानंतर संतांच्या पादुका पालखीतून पंढरपूरला नेण्याची प्रथा सुरू झाली; पण पूर्वीच्या काळी दरोडे, आराजकता यामुळे वारीला धोका निर्माण होण्याची शक्यता असे. अशा वेळी साताराजवळील आरफळ येथील सरदार शिंदे यांनी वारीला संरक्षण देण्याची जबाबदारी घेतली. त्यांनी आपले सैन्य पाठवून वारीला संरक्षण दिले. आजही त्यांच्या वारसांना वारीमध्ये मानाचे स्थान असते.

संतांनी दिलेल्या समानतेच्या तत्त्वाचे पालन आजही वारी परंपरेमध्ये दिसून येते. म्हणूनच लहान थोर सर्वच वारकरी एकमेकांना माऊली म्हणून नमस्कार करतात. त्यामध्ये लहान-थोर असे काही नसून सर्वच वैष्णव एक आहेत, असा संदेश दिला जातो.

वारी परंपरेने महाराष्ट्राची संस्कृती जपण्यासोबतच सामाजिक सहिष्णुताही जपली आहे. तसेच भक्तिमार्गासोबतच ज्ञानमार्ग आणि कर्ममार्गाचे आचरणही समाजात रुजवण्याचे काम या सांप्रदायातील अनेक संतांनी केले आहे. संतांमध्ये अनेक जातीचेच नाही, तर धर्माचे लोकही या सांप्रदायामध्ये सहभागी असल्याचे दिसून येते. या सर्व संतांनी महाराष्ट्र समाजाची ग्रामीण वीण घट्ट बांधण्याचे काम केले. संतांनी फक्त भक्ती, ज्ञान याचा संदेश दिला नाही, तर त्यांनी कर्मातून भक्ती, योग याबरोबरच स्त्री सशक्तीकरणाचा संदेशही दिला आहे. संत शेख महंमद यांच्यासारख्या मुस्लीम संतांनी, तर भक्तीमध्ये समन्वयवादाचा संदेश दिला आहे.

संत ज्ञानेश्वर यांनी 'ज्ञानेश्वरी', 'अमृतानुभव' या ग्रंथांतून ज्ञानयोग





व भक्ती रुजवली, तर संत चोखामेळा यांनी समतेचा संदेश दिला. संत तुकारामांनी कीर्तनाच्या माध्यमातून समाजसुधारणेचे काम केले. संत नामदेवांनी भक्ती संप्रदाय उत्तर भारतात रुजवला. त्यांचे अभंग गुरुग्रंथसाहिबामध्येही आहेत. संत एकनाथांनी भागवत धर्माचे पुनरुज्जीवन करण्याचे मोलाचे कार्य केले. संत गोरा कुंभार, संत नरहरी सोनार, संत सावता माळी यांनी कर्मातून भक्तीचा संदेश दिला. हा संदेश देताना संत सावता माळी म्हणतात, 'कांदा, मुळा, भाजी अवघी, विठाई माझी'. संत कान्होपात्रा आणि संत बहिणाबाई यांनी स्त्रीमुक्ती आणि स्त्री सशक्तीकरणाचे काम भक्तीमार्गातून केले. याशिवाय संत निवृत्तीनाथ, संत मुक्ताई, संत जनाबाई, संत धन्ना भगत, संत निळोबा यांनी वारी परंपरा राज्याच्या गावागावांत पोहोचवण्याचे काम केले.

या वारी पंरपरेने भक्तिमार्गाला प्राधान्य दिले. सर्वसामान्यांना त्यांच्या भाषेमध्ये भक्तीचे महत्त्व सांगण्यासाठी; तसेच समाजातील वाईट चालीरितींवर प्रहार करण्यासाठी साहित्याची निर्मिती केली. अभंग, भारूड, गवळण अशा साहित्यांतून त्यांनी जनजागृती केली. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ यांनी लोकभाषेतून अध्यात्माची शिकवण दिली. तसेच वारकरी संप्रदायाने मूर्तीपूजेपेक्षा आत्मशुद्धी, साधेपणा आणि ईश्वरप्रेमावर भर दिला आहे.

जातीपातीच्या पलीकडे जाऊन सर्व समाजाला एकत्र आणण्याचे काम वारीने केले. जातिभेद, धर्मभेद या विरुद्ध जागृती केली. सर्वधर्मसमभाव आणि वसुंधैव कुटुंबकम् ही मूल्ये समाजात रुजवली. त्याबरोबरच वृक्षवल्ली आम्हा सोयरे म्हणत निसर्ग जपणुकीची शिकवणही दिली. वारीमध्ये लाखो लोक एकत्र चालतात, हे सामाजिक ऐक्याचे

एक प्रतीक आहे. वारीमध्ये कोणताही जात, धर्म, वर्ग, आर्थिक स्थिती यांचा भेद नसतो. वारी संप्रदायाने साधे जीवन, उच्च विचार हे मूल्य समाजात पेरले. नास्तिकतेच्या किंवा अंधश्रद्धेच्या कडेलोटात न जाता, संतांनी विवेकाधारित भक्तीची वाट दाखवली. यामुळे समतेवर आधारित समाजरचना घडून आली.

वारीच्या निमित्ताने कीर्तन, अभंग, भजन यांसारख्या सांस्कृतिक प्रकारांचा विकास झाला. यामुळे महाराष्ट्राची संस्कृती भक्तिपंथी आणि समर्पणशील बनली. वारी ही एक सामाजिक सांस्कृतिक चळवळ आहे. साधेपणा, अहिंसा, सत्यनिष्ठा, संयम, परोपकार यासारखी जीवनमूल्ये रुजवली. जिव्हाळ्याची भक्ती, दैनंदिन जीवनात ईश्वरस्मरण ही संकल्पना आत्मसात केली. वारी संप्रदायाने महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात परिवर्तन घडवून आणलं. वारी ही फक्त धार्मिक यात्रा नसून ती एक सामाजिक समतेची, भक्तीची, सांस्कृतिक ऐक्याची आणि मानवी मूल्यांची जिवंत परंपरा आहे. संघटन, सहकार्य, सहिष्णुता आणि लोकजागृती यांचे जिवंत उदाहरण आहे.



वारी संप्रदायाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडण–घडणीत भक्तिपंथाचा मानवतावादी पाया घातला. वारी ही केवळ एक धार्मिक परंपरा नाही, ती सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परिवर्तनाची चळवळ आहे. मराठी संस्कृतीतील संत परंपरा, भक्ती साहित्य, लोककला, समतेची भावना आणि एकात्मता यामध्ये वारी संप्रदायाचे मोठे योगदान आहे.

## पंढरपूरचे विठ्ठल मंदिर

पंढरपूरचे विठ्ठल मंदिरे हे होळसय राजा विष्णूवर्धन यांनी नवव्या शतकात बांधल्याचे दिसून येते. या मंदिराचे उल्लेख त्याहीपूर्वी सहाव्या शतकामध्ये आढळतात. सन ५१६ मधील राष्ट्रकुटांच्या एका ताम्रपटात पंढरपूरच्या आसपासच्या गावांचा उल्लेख आढळतो. तसेच यामध्ये पंढरपूरच्या देवळाचा माडू म्हणून उल्लेख आला आहे. माडू म्हणजे लहान देऊळ. त्यानंतर होळसय राजवटीमध्ये या मंदिराचा जीर्णोद्धार होऊन ते मोठे करण्यात आले. ८४व्या शिलालेखावरून हे स्पष्ट होते. तसेच या शिलालेखानुसार होळसय राजा विष्णूवर्धन याने मंदिरातील पूजा आणि मंदिर देखभालीसाठी हिरियागंजा हे गाव दान दिल्याचेही नमूद आहे. तसेच मंदिराला दान देणाऱ्यांची नावे आणि गावांचा उल्लेख असलेल्या या ८४व्या शिलालेखावरून या मंदिराला महाराष्ट्रासह तेलंग, कानडी लोकांनीही दान दिल्याचे दिसते. तसेच यामध्ये विदर्भातील नागपूरपासून कोकण प्रांतातील दानशूर व्यक्तींनी दान दिल्याचे दिसते. या लेखामध्ये यादव नृपतींनीही या मंदिरासाठी दान दिल्याचे दिसून येते. तसेच बायकांची बारी येथे असलेल्या शिलालेखावरून यादव राजा भिल्लम याच्या काळात या मंदिराचा पुन्हा जीर्णोद्धार झाल्याचे दिसून येते. या जीर्णोद्धाराचे काम विठ्ठल नायक नावाच्या एका अधिकाऱ्याने केले असल्याचेही लिहिले आहे.

प्राचीन काळात बांधण्यात आलेल्या या मंदिराचा पेशवे काळात पुन्हा नव्याने जीर्णोद्धार करण्यात आला आणि आता आपल्याला दिसत असलेली मंदिराची बांधणी ही मराठा कालखंडातील आहे. यानंतरच्या काळात मंदिरामध्ये नव्याने बांधकाम झाल्याने प्राचीन काळातील काही भाग झाकला गेला आहे; पण त्यामुळे या मंदिराचे सौंदर्य कोठेही कमी झालेले नाही.

गर्भगृह, अंतराळ आणि सभामंडप अशी या मंदिराची रचना असून मंडप हा १६ खांबांवर तोललेला आहे. याशिवाय मंदिरामध्ये एक चारखांबी मंडपही आहे. या खांबांवरील नक्षीकाम आणि कोरीव काम पाहता होळसय, यादव काळातील कलाकुसरीचे दर्शन घडते. तसेच प्रत्येक खांबावर असणाऱ्या वेगवेगळ्या कलाकृती हे खास होळसय शैलीचे वैशिष्ट्यही या ठिकाणी पाहावयास मिळते. त्याशिवाय मंदिराच्या गर्भगृहाजवळ असलेले जय – विजय हे लक्ष वेधून घेतात. मंदिरातील खांब आणि दरवाज्याच्या चौकटीवर असणारे यक्ष आणि यक्षिणींचे शिल्प सुंदर आहेत. त्याशिवाय विठ्ठल मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश करताना वरील बाजूस असणारी दगडी कमान हे खास होळसय, यादव या काळातील बांधकाम शैलीचे वैशिष्ट्य लक्ष वेधून घेते. तसेच दरवाजाच्या उंबऱ्यावर व्याल कोरण्यात आल्याचे दिसून येते.

गेल्या वर्षी या मंदिराला मूळ स्वरूप प्राप्त करून देण्याचे काम पुरातत्त्व विभागामार्फत करण्यात आले. यावेळी मंदिरामध्ये सापडलेल्या तळघरात अनेक मूर्ती आढळून आल्या आहेत. त्यामध्ये सध्याच्या विठ्ठल मूर्तीसारखीच एक मूर्तीही आहे. तसेच विष्णूच्या इतर रूपातील मूर्तीही सापडल्या आहेत. वैशिष्ट्य म्हणजे या मूर्ती दाक्षिणात्य धाटणीच्या असून त्यावर वैष्णव टिळा अर्थात कपाळावर असलेला उभा गंधही कोरण्यात आला आहे. बेलूरच्या चन्नाकेशवाच्या मूर्तीशी साम्य असणारी; तसेच हम्पीच्या मूर्ती शैलीशी साम्य असणाऱ्या मूर्तीही येथे सापडल्या आहेत.

**(विभागीय संपर्क अधिकारी, मा.व.ज.स. मंत्रालय, मुंबई.)**

# लम्हा लम्हा

**अजय भोसले**

लम्हा लम्हा...... कवयित्रीच्या सूक्ष्म स्पंदनांचा एक तरल, काहीसा अलिप्त असा अवकाशाचा अव्यक्त कोपरा आहे. घुसमटलेल्या भावनांचा जागर आहे. खोल रुतलेले आवेग, क्षण शब्दांच्या माध्यमातून मुक्त होतात. ते क्षण मग तुम्हाला nostalgic करतात तुमच्या नकळत. छोट्या घटनांमधून भावनांचे विविध कंगोरे फेर धरू लागतात. तुमच्या मनाला ओढतच भूतकाळात घेऊन जातात.

दूरपर्यंत जाताना त्यांना भूतकाळाच्या विवरात अडकायचं नाही. सर्व मागे सोडून पुढचा प्रवास करायचाय. दूर एका चर्चमध्ये या कवितेत त्या स्वतःचं अस्तित्व शोधतायत. भर पावसात चिंबायचं तर कशासाठी? या जाणिवेने त्या व्यथित झाल्या आहेत. पावसातून निथळत येणारा प्रकाशही नकोसा झालाय. एकटंच दूर जायचं आहे. किती दूर हेही ठाऊक नाही, इतकं दिशाहीन झालंय सर्व. मी पाहिलंय या कवितेत थोडासा आशावाद डोकावतो. दऱ्या–खोऱ्यातील बासरीचे सूर त्यांना उमेद देतायत. काल उत्तररात्री या कवितेत एक भकासपणा, उदास सूर आहे. जगण्याचं चैतन्य हरपल्यासारखं, जग काळोखात हरवलं आहे.




हलकेच कानात काही सांगून चंद्राने कवयित्रीच्या मनात चैत्रपालवी पुन्हा फुलविली आहे. शब्दांच्या जंजाळात मनाची घुसमट थांबणार कशी? त्यासाठी निसर्गाला साद द्यायला हवी, त्याच्या बाहुपाशात स्वतःला मुक्तपणे झोकून द्यायला हवं असं त्यांना वाटतं. वाळवंटातल्या रात्री, स्वप्न घुसमटली आहेत. किनाऱ्याच्या शोधात फिरतायत आशेने. रखरखत्या वाळवंटात स्वप्न मुठीतल्या वाळूसारखी सुटताना दिसतायत, तेव्हा अंतर्नाद क्षीण होतोय. किनाऱ्याकडे फिरून त्या माघारी येतायत हतबल होऊन.

कल्पनांच्या धाग्यातून, पुस्तकातील वाळलेल्या फुलातून अर्ध्या–मुर्ध्या कवितेतून एकाकीपणाला सोबत मिळते. जीवनाचा वेगळा अर्थ उमगायला लागतो. कुणास ठाऊक केव्हापासून या कवितेत त्यांना प्रवासाची नेमकी दिशा सापडत नाही. पावसाच्या ओघळणाऱ्या पाण्यात त्यांना त्याचं एकाकीपण प्रखरतेने जाणवतय. उघड्या डोळ्यांनी पाहण्याची हिंमतही होत नाही. आठवणी...एकाकीपणाला सोबत करतात. सख्य असतं जणू दोघांचं, त्यांचं अस्तित्व काय आहे एकमेकाशिवाय?

थकून गेलेल्या आयुष्यापासून त्यांना दूर जायचं आहे. पारदर्शी निळ्या आकाशाखाली एकाकीपणाच्या अभिशापापासून मुक्त व्हायचं आहे. त्यासाठी आसवांच्या बदल्यात हसूही विकत घेण्याची तयारी आहे. इतका हताशपणा आलाय. कालची रात्र त्याच्या अस्तित्वाची जाणीव करून देत होती. तो फक्त आभास होता. रात्र मंद झाली होती. कणरूप घेऊन न सरण्यासाठी. त्या निखळत्या ताऱ्याला मुठीत घट्ट धरून ठेवलंय आठवणीच्या स्वरूपात. त्या आठवणींनी वेदना होत असतानाही, हातातून जे ओघळेल त्याला रक्त कसे म्हणावे, असा प्रश्न त्यांना पडला आहे.

सर्वच कविता सुंदर आहेत. भावनांचे सच्चे प्रतिसाद आहेत. सूक्ष्म आवेगांचे हुंकार आहेत. मी या कवितेत त्यांनी मनाची स्थिती नेमकेपणाने मांडली आहे. ते धुळीसारखं कधी एकवटतय, तर कधी विसकटतय. आपल्या जीवनातील काही विशिष्ट लोकांबद्दल सांगताना थोडक्याच शब्दात नात्याचे धागे उलगडून दाखविले आहेत. नाती बदलतात; परंतु विशिष्ट लोकांना आपल्या जीवनातून वगळता येत नाही. जरा दूर गेल्यावर या कवितेत कुणीतरी जवळ येऊन दूर गेल्याची जाणीव, कोण जाणे कधी या कवितेतील एकटेपणाच्या प्रवासात त्या एकट्या नसल्याची होणारी जाणीव, जेव्हा खूप काही सांगायच असतं तेव्हा काहीच सांगावंसं न वाटणं.. हे सर्व पडसाद, कवयित्रीच्या संवेदनशील मनाच्या खुणा आहेत. तिच्या मनाचे निरागस, सत्य प्रतिबिंब आहे. काढून टाका सगळ्या घंटा ही कविता माणसाच्या दांभिकपणाची प्रकर्षाने आठवण करून देते. माणसातला माणूसपणा इतक्या सहजतेने उलगडलेला मी आतापर्यंत पाहिलेला नाही. ही कविता त्यांच्या सामाजिक भानाची ओळख करून देते.

सर्व कविता एका समान धाग्याने बांधलेल्या आहेत. त्याचे वेगवेगळे पैलू दिसत असले तरी, खोल आर्त जाणिवेने कवयित्रीच्या प्रतलात त्या एकरूप झालेल्या आहेत. प्रत्येक कविता मागच्या कवितेचं ओझं घेऊन येते . त्या ओझ्यातून मुक्त होण्यासाठी मग आवर्तनांची मालिका सुरू होते. कवयित्रीची अनुभूती शब्दांच्या झुल्यावर झुलू लागते. भावनांच्या कुंचल्यातून फुलू लागते. दीप्ती नवल यांच्या कवितेत एकेटपण, उदासपण, भकासपणा आहे. मधूनच आशेचा थंडगार शिडकावा आहे. छोटे–छोटे क्षण आहेत, परंतु शब्दांची ताकद, कवितेमागचा पटल पारदर्शीपणे समोर ठेवते. कोणताही आडपडदा न ठेवता. या भावना अजून काही काळ घुसमटत राहिल्या असत्या तर त्याचा उद्रेक झाला असता, असं वाटतं. कवयित्रीच्या अनुभूतीच्या प्रवाहात आपणही सहप्रवासी होऊन जातो. स्वत: कविता वाचून आनंद घेणे वेगळा अनुभव आहे. सर्व कवितांचा अनुवाद आसावरी काकडे यांनी इतक्या प्रवाही, ओघवत्या शैलीत केला आहे की, नेमक्या मूळ कविता कोणत्या आहेत हे क्षणभर उमगत नाही. जरूर वाचा...

**(अवर सचिव, महाराष्ट्र शासन)**

## स्वप्नातली मुंबई...

लहानपणी भिकार-सावकार नावाचा घरात सैकाक्याचा बैठा खेळ
आम्ही खेळायचो. त्यामध्ये मरीन ड्राईव्ह, मॅट रोड, चर्नी रोड
अशी स्थानकं आम्ही विकत घ्यायचो
सोबतचा खेळाडू आला की त्याजकडून भाडे वसूल करायचो ।
तेव्हाही नावं परदेशातली
थंड हवेच्या ठिकाणांची वाटायची.... तेव्हा माहीत नव्हतं की आपल्या
नशिबाची सोंगटी आपल्याला
मुंबईत घेऊन आणेल इथे आल्यावर कळलं की ही स्टेशनं
विकत घेणं लांब.... इथे भाड्याने राहणंसुद्धा
आपल्याला नाही परवडणारं!!
वाहत चाललंय आयुष्य समळं.
तुंबलेल्या गटारांमधून, रस्त्यारस्त्यावर साचलेल्या पाण्यातून
अन् नेहमी नेहमी चोकअप होणाऱ्या
शासकीय निवासस्थानाच्या टॉयलेटमधून !
वाहत चाललंय आयुष्य समळं
चिकट घामाच्या धारांमधून,
लोकलच्या नेहमीच्या सुसाट गर्दीमधून
रोज ओल्याचिंब होणाऱ्या रुमालातून अन्
अंधूक होत जाणाऱ्या तळहातांच्या रेषांमधून !
वाहत चाललंय आयुष्य समळं
चार भिंतीच्या कोपऱ्यामधून
घर ते ऑफिस अन् ऑफिस ते घर
या अपरिहार्य नशिबाच्या फेऱ्यातून
अन् सुटत चाललेल्या पोटाच्या घेऱ्यातून !
वाहत चाललंय आयुष्य समळं
दिवस अन् रात्रीच्या चक्रातून
अंधारत चाललेल्या संवेदनशीलतेतून अन्
उजळत जाणाऱ्या यंत्रवत जाणिवेतून
समळंच कृत्रिम असणाऱ्या आखीव चौकटीतून !!
वाहत चाललंय आयुष्य समळं
फास्ट लाईफच्या संथ लयीतून
माणं विसरत चाललेल्या हळुवार ओठातून
अन् जिंकण्यासाठी पळणाऱ्या मुर्दाड मनातून
पण कायमचं पराभूत, या मुंबईतल्या जिंदगीतून !!!

**– अतुल कुलकर्णी (अवर सचिव, महाराष्ट्र शासन)**



## शोध स्वतःला आज तू...

शोध स्वतःला आज तू, ओळख स्वतःला तू
का होतेस हताश तू, का नेहमी झुकतेस तू
का नेहमी लोकांच्या नजरेत, स्वतःला तोलतेस तू
बनव तुझ्या कर्तृत्वाची मशाल, तेजाळून जा तू
शोध स्वतःला आज तू
ओळख स्वतःला तू



का नेहमीच पायात तुझ्या
समाज रूढींचे पाश हे
का नेहमीच परिस्थितीसमोर
हतबल होतेस तू
तोड सर्व पाश आज तू
हो स्वतः मुक्त तू
शोध आज स्वतःला तू
ओळख स्वतःला तू

ठेवले उंबरठ्या आड तुला, सोड उंबरठा तू
स्वअस्तित्वाची कर लढाई, घे लेखणी हाती तू
रणरागिणी बनून तू, जिंक सारे आकाश तू.
शोध स्वतःला तू, ओळख स्वतःला तू.

का ओंगाळल्या नजरेने, नेहमीच घायाळ व्हावेस तू
का ओंगाळल्या स्पर्शाने, शरमेने मान खाली घालावीस तू
सोड भीती, हो खंबीर, घे शस्त्र हाती तू
शोध स्वतःला तू, ओळख स्वतःला तू

मोकळे आकाश हे, जे तुझेच आहे
घे भरारी अवकाशी तू, वाट कशाची पाहतेस तू
आहे सामर्थ्य तुझ्यामध्ये, तोड बेड्या सर्व तू
शोध स्वतःला तू, ओळख स्वतःला तू

घे मोकळा श्वास तू, घे नव्या जगाचे भान तू
विसर स्वतःला तू, ल्यावेस नवे वस्त्र तू
राहा उभी तू, बनव स्वतःची ओळख तू
शोध स्वतःला तू, ओळख स्वतःला तू
शोध स्वतःला तू, ओळख स्वतःला तू

**– मनीषा चं. अपराध (स.क.अ., महाराष्ट्र शासन)**



## आठवणींचा विळखा...

कवितांच्या गावामधील एक गाव सुने सुने
पारावरची म्हातारी जणू खात बसली कोवळी उन्हे
वळणवाटा उरल्या ना उरले कोठे तांबडे रस्ते
दगड, विटा, मातीचे विखुरलेले ढिगारे नुसते
दूर डोंगरावरचे देऊळ, शोधते जणू नव्या भक्ता
कोमेजलेली फुले कोरडी अन्
मुका झालेला कोणी वक्ता
कोरडे होते घाट अन् घरांवरती ओल्या जखमा
घरे जाळली त्यांना नियमाने मिळतो तनखा
तरी वाळल्या खोडातून अंकुर नवा फुटतो आहे
आठवणींचा विळखा हळुहळू सुटतो आहे...

**– प्रवीण कुलकर्णी**
**(सहायक संचालक, मुख्यमंत्री कार्यालय)**

## पाऊस

हा पाऊस म्हणजे थेंबातूनी प्रश्नांची सरबत्ती
मी काय खुलासे करू नभाशी इतके भिजल्यावरती
मी रोज नव्याने वाचू पाहते पाण्यावरील अक्षरे
हा पाऊस काही नवेच लिहितो माझ्या रस्त्यावरती
ही झाडे, वेली, गवत सारी मातीची लेकरे
हा पाऊस त्यांना अपुले म्हणतो भिजवुनी गेल्यावरती
हे जाणवते मज पानांमधुनी बावरते हसते कुणी
या सरी नव्हे तर हरिताच्या गोड आठवणी
हा पाऊस आणतो आभाळातून आठवणीची चित्रे
हा पाऊस म्हणजे थेंब कळ्यांचा गुच्छ शुभ्र चंदेरी रत्ने.

**– रोहिणी सकपाळ (कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन)**

## कॉफी आणि बरचं काही...

आवडे कॉफी ज्याला, त्याला
नाही आवडत दुसरे काही
कारण कॉफीसोबत नेहमी
असते आणि बरचं काही...

कडू चव जरी, परि जिव्हेला
हिचीच गोडी लागून राही
कारण, कॉफी सोबत नेहमी
असते आणि बरचं काही...

आठवण कॉफीची ती येता
याद गुलाबी येतच राही
कारण कॉफीसोबत नेहमी
असते आणि बरचं काही...

आवडीच्या त्या व्यक्तीसंगे
जीवा एकदा पिऊन पाही
कुठेल तुजला सुख पिण्याचे
मिळेल आणि बरचं काही...



**– सतीश मोघे (निवृत्त उपसचिव, महाराष्ट्र शासन)**

# मुलांचा आहार आणि व्यक्तिमत्त्व

डॉ. प्रकाश कोंडेकर



'पेराल तसे उगवते' ही खूप प्रचलित म्हण आहे. तान्हं बाळ जसं जसं आईच्या दुधावर मोठं होतं, तसेच बाळाच्या व्यक्तिमत्त्वातही फरक होत असतो. काही महिन्यांनंतर जेव्हा बाळ आईच्या दुधावरून गाईच्या दुधावर येतं, त्यावेळी अजाणतेपणी बाळाच्या हालचाली व व्यक्तिमत्त्वामध्येही बदल होत असतो. याचे मुख्य कारण म्हणजे बाळाच्या पचनसंस्थेमध्ये होणारे बदल व बदललेल्या दूध पिण्याच्या वेळा.

काही दिवसांनंतर जेव्हा दुधाव्यतिरिक्त इतरही खाणे बाळाला दिले जाते, त्यावेळी आईची बाळाबरोबरची जवळीक थोडी कमी-कमी होते व त्यामुळे बाळाचे व्यक्तिमत्त्वातील होणारे बदल, बऱ्याच प्रमाणात व वेगवेगळे असतात. वेगवेगळ्या रंगांची फळे, फळांचे रस, वेगवेगळ्या रंगांच्या भाज्यांचे सूप, याचाही परिणाम वाढत्या वयाच्या मुलामुलींवर होत असतो.

पण काही वेळा मुलांना होणाऱ्या आजारपणाची कल्पना डॉक्टरांनाही येत नाही व त्यावेळी त्यांना ती हार वाटते; पण ते तसे नसून घरात मिळणारा अयोग्य अथवा अपुरा आहार यामुळेही हे आजार होऊ शकतात आणि याचे परिणाम मुलांच्या व्यक्तिमत्त्वावर होत असतात. या गोष्टी पालकांच्या मनात असलेले खाण्या-पिण्याबाबतचे वेगवेगळे समज गैरसमज हे कारणीभूत असतात. याचबरोबर वेगवेगळी प्रसारमाध्यमे यांचाही पगडा मुलांवर व पालकांवर होत असतो.

खाण्याच्या बाबतीत एक गोष्ट ध्यानात ठेवणे अतिशय महत्त्वाचे आहे, ती म्हणजे, व्यक्ती तितक्या प्रकृती. म्हणूनच खाण्यामधील एखादा पदार्थ एकाला चालला म्हणून दुसऱ्याला चालेल हे गृहीत धरू नये व मुलामुलींच्या खाण्याची तुलना करू नये. जे आरोग्यासाठी व व्यक्तिमत्त्व विकासासाठी योग्य ठरत नाही, यासाठी काही तत्त्वांचे पालन करणे लाभदायी ठरू शकेल.



B.sc (Hons)
LL.B,N.D, AVR, FRSH (LONDON), BTER (UK) IIPA Member.



- वेळेवर दिलेला योग्य आहार.
- एखाद्या योग्य अशा व्यक्तीवरील विश्वास.
- दुसऱ्यांबद्दलची गुणग्राहकता.
- आपले चांगले अनुभव दुसऱ्यांना सांगणे.
- नियमित मनाचा व शरीराचा व्यायाम करणे.
- अधून-मधून डॉक्टरांचा सल्ला घेणे वगैरे-वगैरे...

***सर्वांना आरोग्य लाभो.***

# एक मंतरलेली सांजवेळ...

**कुसुमानंद (प्रशांत कुसुम आनंदराव सातपुते)**



'पडू की नको..'अशा द्विधा अवस्थेत काळवंडलेला.. जलबिंदूंचा ढिगारा पदराच्या ओटीत घेऊन, ढगांचा मांडव आकाशात पसरत होता. 'म्हातारीचे केस' हवेवर भूर्रकन उडून जावेत, तसा हा पदर पुढे पसरत होता. जलकणांचे गाठोडे मात्र, घट्ट बांधून घेऊनच! त्याच्या पसरण्याने, पुढे पळण्याने मांडवाचे छत फाटून त्याला सुरुवातीला सांदर, झरोका अन् पुढे भगदाड पडत होते. निळे-पांढरे आकाश भगदाडातून पृथ्वीला भुलावत होते. आमचा सूर्याबा या झरोक्यातून मधूनच मिचकावून जात होता. जणू मार लागून झालेल्या काळ्या-निळ्या ढगात लालसर सुजेची झाक देत एकदम गडप होत होता. काही क्षण तो गायब तर, त्याचे दूत किरणं कवडस्यातून ढगांना फाकत समोर ठाकलेली. हे मनोहारी दृश्य होते.

अशा या रम्य सांजवेळेची साक्ष होत, मी आणि सौ. पक्ष्यांच्या ओढीने पुढे निघालो. पक्ष्यांच्या विणीचा हंगाम असल्याने, कंठ फुटलेला काळाकुट्ट लाल डोळ्यांचा कोकीळ जोडीदाराला जागोजागी साद घालताना ऐकू येत होता. या झाडावरून त्या झाडावर उडताना दिसत होता. कावळ्याशी मध्येच भांडत होता. त्याला आपल्या मागे यायला लावून बेरकीपणाने मादीला अंडी घालण्यासाठी संधी निर्माण करून देत होता.



फेब्रुवारीत अनुभवलेला तो भन्नाट रानवारा आज इथे नव्हता..त्याला प्रतिसाद देत, त्याच्या तालावर डोलणाऱ्या गव्हाच्या लोंब्याही आज नव्हत्या, वा आज्ञाधारक सैनिकाप्रमाणे हारीने उभे राहणारे गव्हाचे पिवळे-पोपटी पीकदेखील नव्हते. शेतकऱ्यांनी ते कधीच मळणी केली होती. पुढच्या हंगामासाठी रानं स्वच्छ करून, मशागत करून तयार ठेवली होती. प्लास्टिक अंथरुण 'गिलकी' घोसाळे लागवडीसाठी सऱ्या सोडल्या होत्या. त्याच्या स्पष्ट खाणाखुणा दिसत होत्या.

वाळवी लागून मरणासन्न अवस्थेत अखेरची घटिका मोजणाऱ्या झाडावर पोपटांचा थवा स्थिरावला होता. त्यातील एखादा बिलंदर नर शीळ वाजवून थव्यातील युवतींवर छाप टाकत होता. डोके, मान, पंख काळसर आणि मधूनच पांढऱ्या रेघोट्या ओढलेला लांब शेपटीचा दयाळ शीळ वाजवत विविध मंजूळ स्वर काढून, मादीला आकर्षित करत बसून होता. ढगांच्या दाटीने अंधारलेल्या मांडवात मोबाइलमध्ये ते सगळे काळवंडलेले दिसत होते.



भरदुपारी गादी पिंजण्यासाठी येणाऱ्या पिंजाऱ्याने आपल्या साधनाची तार छेडून गल्लीत आल्याची वर्दी द्यावी, तसा आवाज आला. तसे आम्ही दोघेही येणाऱ्या आवाजाच्या रोखाने पाहातच राहिलो. आंब्याच्या झाडावर नीलपंखीची एक जोडी बसलेली दिसली. सावधपणे त्यांना टिपताना, माझी चाहूल लागून, त्यातील एक निळे पट्टेदार पंख पसरत उडाला आणि लांबवर असणाऱ्या संरक्षण भिंतीवर विसावला, तर दुसरा नजीकच्या आंब्याच्या शेंड्यावर..!

एव्हाना रानपिंगळ्यांची फडफडाट झाली. आपले अस्तित्व दाखवत दोन-चारजण या फांदीवरून त्या फांदीवर उगीचच विसावले. मान पुढे काढून, आम्हा दोघांना न्याहाळू लागले. इट्टुकली; पण सरावाने धिट्टुकली बनलेली खार फांदीवरून पळत होती. एव्हाना परिसरात 'टी..टीव्ह..टीव..' चा टिटवीचा आवाज परिसराला भेदत होता. हा हंगामच असल्याने, घरटी, अंडी, उबवण आणि पिलांचे संगोपन हा त्यांचा दिनक्रम, त्यांच्या त्या आवाजात भरून राहिलेला. दोन-चार टिटवी उघड्या-बोडक्या रानाशी एकरूप होत पळत होत्या.



'तुला टिटवीचे घरटे वा पिले पहायचीत का..?' असे हलक्या आवाजात सौ.ला विचारून सावध पावलांनी माझ्या मागे येण्यास तिला खुणावले. थोड्या अंतरावर आई-वडील आणि दोन गोड-गोजिरी सुंदर पिले असा निसर्गाचा अतिशय अद्भुत आणि सुंदर नजारा मला दिसला. काटकीसारख्या पायाने दुडू-दुडू पळत, आई-बाबांसारखे उगीचच मातीच्या भेगाळलेल्या ढेकळात आपली इवलीशी चोच मारत, ते त्यांना कॉपी करत होती. पळताना कधी पडत होती. आजूबाजूच्या परिसराशी एकरूप झाल्याने, ती पिले लवकर ओळखून येत नव्हती. कितीही दबक्या पावलांनी आम्ही तिथे गेलो असलो तरीही, टिटवीच्या जोडीला आमच्या दोघांचीही चाहूल लागली होती. दोघांनीही जोरजोरात ओरडून दंगा चालवला होता. एकजण तर अंगावर येत, चेतावणी देत होता. हे सगळं मनमोहक, भावूक, भुरळ घालणारं अन् आक्रमक दृश्य टिपून आम्ही दोघेही तेथून पुढे सटकलो आणि त्यांचा जीव भांड्यात पडला. कारण आमच्यापासून त्यांना कोणताही धोका नाही, हे जाणवल्याने त्यांचा दंगा आता शांत झाला होता.



पंखांची दोन-चारवेळा सलग फडफड करत आणि मध्येच काहीवेळ स्थिरावत अशा उडण्याच्या स्टाईलने डोक्यावरून राखीधनेशाची indian grey hornbill एक जोडी विहरत दूरवरच्या झाडावर विसावली. धनेशाच्या







आणखीही एक-दोन जोड्या आवाज काढत, शेपट्या हलवत, इतस्ततः पाहत झाडावर बसून होत्या. गुलाबाच्या ताटव्यात आलो. शेतकऱ्यांनी बागेची बऱ्यापैकी छाटणी केलेली दिसत होती. शेवंती वर्गातील स्थानिक बिजली नाव असलेल्या फुलांचा एक राखीव ताटवा ठेवलेला दिसला. त्यात मधमाशी आपले मकरंद शोषणाचे काम बिनचूक करत होती.

काश्मीर सफरीत शंकराचार्यांच्या मंदिराकडे जाताना अशीच गुलाबातील मकरंद गोळा करताना मधमाशी दिसली होती. पुढे ती मुघल गार्डनमधील टुलीपवर्गीय फुलातील मकरंद शोषतानाही आढळली होती. अगदी तसेच ती येथे मनमुराद मधुकण वेचत होती. कधी या, तर कधी त्या फुलावर बसून, उडताना तिचा नाद वातावरणात विरून जात होता. तिच्यासाठी सर्व रंगांची, सर्व वर्गातील फुले सारखी होती.

ज्यावेळी मधमाशी या जगातून संपेल, त्यानंतर अवघ्या चार वर्षांनंतर मनुष्य जातीचे अस्तित्वच संपुष्टात येईल. असे अल्बर्ट आइनस्टीन म्हणतो. सपुष्प वनस्पतींना मधमाशीचा होणारा स्पर्श हा परिस स्पर्शापेक्षा कमी नसतो. फलधारणेसाठी पर परागीकरणात महत्त्वाची भूमिका मधमाशी पार पाडत असते.

त्या विलोभनीय प्रसंगाला चित्रबद्ध करून तलावाशेजारी आलो. तर पुन्हा पिंजाऱ्याने तार छेडावी, तसा आवाज काढत, विजेच्या खांबावर नीलपंखीची जोडी विसावलेली. त्यांना चित्रित करून तलावाच्या काठावर आलो. फेब्रुवारीत भरलेल्या तलावात बदक, पाणकावळे, पाणकोंबड्या, पांढऱ्या बगळ्यांना पोहताना पाहायला मिळालेले चित्र आज नव्हते. तलाव पूर्णपणे आटलेला दिसत होता. एक-दोन ठिकाणी डबके म्हणावे इतपतच पाणी होते. त्यातही करकोचे आणि बगळे चोचा मारत उडत होते. हा विणीचा हंगाम असल्याने नेहमी पांढराशुभ्र दिसणाऱ्या गायबगळ्यावर विटकरी, लालसर-मातकट रंग चढला होता.

पाणकोंबडी ओरडून इकडून तिकडे धावत झुडुपात गडप झालेली. खारींचा समूह झाडावरून खाली, शेतातून झाडावर लगीनघाईसारखा वावरत होता. परतीच्या वाटेवर भारद्वाज अर्थात कुंभारकावळ्यांच्या जोड्या झाडावर उड्या मारताना दिसल्या. 'हूपूपूप' आवाज काढून आपल्या 'पार्टनर'ला साद घालताना ऐकायला मिळाले. जोडीदारणीचा मिळालेला प्रतिसाद आपलासा करत या जोड्या नजरेआड झाल्या.

'पुक..पुक' आवाज काढत पुकपुक्या अर्थात तांबट मादीला साद घालत, झाडाच्या अगदी शेंड्यावर बसून होता. त्याच्या 'पुकपुकण्याला' तत्काळ प्रतिसाद देत 'ती' त्याच्या नजीकच्या झाडावर स्थिरावताना दिसली. मात्र आणखी एक प्रतिस्पर्धी त्याच्याच जवळ येऊन बसला. त्या दोघांच्या शाब्दिक द्वंद्वात एकजण तेथून उडाला. तशी 'ती' देखील..!

टिटवीची 'टीव टीव' ऐकतच पुढे आलो. विजेत्या पैलवानाने डोईवर कोल्हापुरी फेटा मिरवावा तसा, लालसर तुऱ्याचा सोनपाठी सुतार वाळलेल्या फांदीला वळसा घालत-घालत शेंड्यावर चढला. चोचीची उगीचच टकटक करत, बसून राहिला. त्याचा साथीदारही लगेचच त्याच्या बाजूला आला. चोचीची उघडछाप करत, इकडे तिकडे पाहत 'त्याने' 'चूकू..चूकू...चू...' अशी लांबलचक किलकारी देत 'तिला' साद घातली. बहुधा तिचा फारसा प्रतिसाद न मिळाल्याने, तो मग पुढच्या शोधात उडाला.

कधी जमिनीवर कटवाक करणारी साळुंखीची जोडी, तर झाडाच्या शेंड्यावर बसून, लयीत तर, कधी कर्कश्श ओरडणाऱ्या जोड्या, भांगपाडीमैना भुरकावणाऱ्या बुलबुलच्या जोड्या, दुभंगलेली शेपूट घेऊन, जोडीदारिणीभोवती घुटमळणारा कोतवाल, जांभळा फुलचुक्या अर्थात सूर्यपक्षी सायंकाळ वाढली, तसे घाईने घरट्याकडे परतलीत.

ढगाळलेल्या जलबिंदूंना फाडून आमचा तांबडा-केशरी सूर्याबा घरी परतत होता. त्याची छबी टिपत आम्ही दोघेही माघारी परतलो. रानाच्या काठावर रस्त्याला समांतर गेलेल्या विजेच्या तारेवर लालबुंद, खलनायकी भेदक डोळ्यांची पांढरीशुभ्र, काळपट पंखांची कापशीघार बसून होती. या शिकारी पक्ष्याच्या धाकाने परिसरात शांतता दाटलेली. त्याच्या एकटेपणाने ती अधिक दृढ झालेली. ती आपल्याच नादात कित्येक वेळ बसून होती. तिला मोबाइलमध्ये बंदिस्थ करून आम्ही घरी परतलो.

मघाशी असणारी रम्य सांजवेळ काळ्याकुट्ट काजळ रात्रीच्या घट्ट मिठीत आता गुरफटून गेली होती. शीतल हवा सुटलेली. रानपिंगळ्यांच्या आवाजाने खिडकीबाहेरील आंबा-लिंब बोलते झाले होते. तेही अगदी क्षणभर! वाऱ्याने गती घेतली, तसा पक्ष्यांचा आवाज थांबला अन् झाडांची खसफस सांगून गेली. आपल्या अदाकारीने जोडीदारणीचे हृदय जिंकणाऱ्या अन् स्वतःचे बहाल करणाऱ्या या मंतरलेल्या जोड्या एकमेकांच्या आलिंगनात, सहवासात, प्रणयाराधनेत विसावल्या असाव्यात, जीवनातील नव्या कोऱ्या दिवसात, नव्या पिढीच्या ब्रह्मांडातील नव्या विहारासाठीच! अगदी मंत्रमुग्धपणे! आता त्याचे द्वंद्व संपले होते. ओटी सांडल्याने पसरलेल्या पदरातून जलकण एका पाठोपाठ एक घरंगळून खाली येत होते. पानांवरून ओघळणारा जलकणांचा आवाज त्याची प्रचिती देत होता.

**(जिल्हा माहिती अधिकारी, रत्नागिरी.)**

# नोकरी करता करता ज्ञानार्जन

**पद्मजा श्रीपाद पाठक**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत १९८३च्या जुलैमध्ये माझा मंत्रालय जगतात प्रवेश झाला. पहिला कार्यभार अतिशय शिस्तप्रिय हुशार अधिकाऱ्यांकडे मिळाला. त्यांनी मला जे Dictation दिलं ते बिनचूक आणि तत्काळ दोन प्रतीत टाईप करून द्यायचं होत. टेन्शन तर खूप आलं होतं, आपल्याला काम नीट जमेल ना याची खात्री नव्हती. ही माझी पहिलीच नोकरी होती. व्यावहारिक जगाचा काहीच अनुभव नव्हता, तरी हिंमत करून मला सांगितलेला मजकूर बिनचूक टंकमुद्रित करून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. मला वाटलं आता माझं नक्की कौतुक होणार; पण प्रत्यक्षात झालं वेगळच. ते माझ्यावर खूप चिडले, कारण मी जरी टिप्पणी बिनचूक टंकमुद्रित करून दिली असली, तरी दोन प्रती काढण्याच्या नादात कार्बन पेपरमुळे काळ्या झालेल्या माझ्या बोटांचे ठसे त्यावर उमटले. त्यामुळे टिप्पणीवर माझ्या बोटांच्या ठशांची नक्षी तयार झाली. तेव्हाच ठरवलं की, आपण जे काम करू ते उत्कृष्टच हवं.

हळूहळू शासकीय कामकाजाची ओळख होत गेली. येथील कामातील एकवाक्यता लक्षात आली. माझा पुढील कार्यभार सहसचिव साहेबांकडे होता. ते अतिशिस्तप्रिय असल्याने त्यांना नवनवीन तंत्रज्ञान शिकण्याची खूप आवड होती. कर्मचाऱ्यांनीदेखील ते आत्मसात करावे, असा त्यांचा आग्रह असायचा. संगणकावर काम करण्याचा सराव झालेला असला तरी संगणकाचा वापर आम्ही फक्त टाइपरायटरला पर्याय म्हणून करत असू; परंतु सहसचिव साहेबांच्या आग्रहाखातर या तंत्रज्ञानाचे विशेष ज्ञान नसलेल्या माझ्यासारखीने स्कॅनिंग फाईल अपलोड करणे, मेल करणे, सर्च इंजिनचा वापर करणे, नेटवरून निरनिराळ्या विषयांवरची माहिती जाणून घेणे अशा अनेक गोष्टी आत्मसात केल्या. तेव्हा माझ्या एक गोष्ट लक्षात आली की, हे ज्ञान मला भरपूर शुल्क मोजून खासगी शिकवणी लावून शिकावे लागले असते. ते बसल्या जागी मिळत आहे. साहेबांच्या सांगण्यावरून मी नवीन तंत्रज्ञान शिकत होते. त्यांच्या सूचनेचा मान राखत होते. स्वार्थातून परमार्थ. यातून एक गोष्ट माझ्या लक्षात आली की, 'हे काम माझे नाही,' असे मी म्हणाले असते, तर या सर्व ज्ञानाला मी पारखी झाले असते. बदलीचा कायदा आला आणि माझी बदली सार्वजनिक बांधकाम विभागात झाली. इथे तर काय उठता बसता दगड, विटा, वाळू, सिमेंट, पेव्हरब्लॉक, टोल हे शब्दच सारखे कानी पडत होते. सकाळ संध्याकाळ मी ज्या नक्षीदार दगडावरून चालत असते त्याला पेव्हर ब्लॉक्स





त्यांच्या अडीअडचणी जाणून घेण्याची संधी मिळते. त्यातून आपल्यालाही बरेच शिकता येते. त्याचे नियमानुसार एखादे काम आपण केल्यावर किंवा नुसता दिलासा दिला, तरी त्यांच्या चेहऱ्यावरील समाधानाने मन हलके होते. हा अनुभव येथेच मिळू शकतो.

आपल्यासोबत काम करणारे अधिकारी–कर्मचारी हे निरनिराळ्या आर्थिक, मानसिक स्तरावरील असतात. त्यांच्याबरोबर आपण जास्तीतजास्त काळ एकत्र काम करीत असतो. त्यामुळे जुळवून घेण्याची मानसिकता आपल्यात निर्माण होतानाचा अनुभव मला आला.

प्रत्येक व्यक्ती वैयक्तिक जीवनात निरनिराळ्या भूमिका बजावत असते. जन्माला येताना ती व्यक्ती बाळ असते, नंतर तेच बाळ मुलगा किंवा मुलगी, भाऊ–बहीण, आई–बाबा, काका–काकू, मामा, आजी–आजोबा

म्हणतात हे इथे आल्यावरच समजले. बीओटी या तीन अक्षरांची खरी ओळख सार्वजनिक बांधकाम विभागात आल्यावरच झाली. अधीक्षक अभियंता साहेबांनी सांगितलेला मजकूर टंकलिखित करताना या अनाकलनीय शब्दांनी चांगलीच तारांबळ उडत होती.

***शासकीय सेवेत रुजू झाल्यानंतर नवनवीन गोष्टी शिकण्याची सकारात्मक ऊर्जा अंगी असणे आवश्यक असते. माझ्या शासकीय सेवेत मी त्याच सकारात्मक ऊर्जेने संगणकीय ज्ञानसह सर्व शासकीय कामकाज शिकून घेतले.***

आपल्या पदाचे काम काय आपण करतच असतो. त्यापेक्षा थोडे वेगळे काम करायचा प्रयत्न करायला काय हरकत आहे, हा विचार करून अधीक्षक अभियंता साहेबांना नेमक्या कोणत्या मुद्द्यावर मजकूर सांगायचा, ते मुद्दे समजून घेऊन मी स्वतःच मसुदा करण्याचा प्रयत्न करू लागले. थोड्या सरावाने मला तेही बऱ्यापैकी जमू लागले. त्याने माझा आत्मविश्वास वाढू लागला. हे काम माझ्या पदापेक्षा थोडे वेगळे होते; परंतु माझे हे नाही म्हणणं मला जमलंच नाही, फायदा मात्र मला नवनवीन गोष्टी शिकताना नक्कीच झाला. जेवढे शक्य होईल, तेवढे शिकण्याचा मनाशी निश्चय केला.

शासकीय सेवेत आपल्याला नवीन गोष्टी शिकण्याच्या खूप संधी असतात. आपण नवनवीन तंत्रज्ञान शिकू शकतो. टिप्पण्या लिहिण्याकरिता आपण जेव्हा नस्तीचा अभ्यास करतो, तेव्हा आपली विचार करण्याची क्षमता वाढत असते. तसेच भाषेवरील प्रभुत्व वाढीस लागण्यास मदत होते. एखादी नस्ती नियमांचा आधार घेऊन सकारात्मक अथवा नकारात्मक करताना बुद्धीचा कस लागत असतो.

मंत्रालय हे राज्याचे मुख्यालय, राज्यातील कानाकोपऱ्यांतून जनता त्यांच्या मागण्या घेऊन मोठ्या अपेक्षेने मंत्रालयात येते. त्यांच्या अपेक्षा पूर्ण करताना आपल्याला अनेक अनुभव येत असतात.

मित्र–मैत्रिणी अशा निरनिराळ्या भूमिकेतून मार्गक्रमण करत असते. आपण त्या भूमिकेशी एकरूप होऊन काम करण्याचा आटोकाट प्रयत्न करत असतो. यशस्वी होण्यासाठी झटत असतो. तेव्हा आपल्याकडून कधीच म्हटले जात नाही की, हे काम माझे नाही. दिवसाच्या २४ तासांपैकी साधारणत: १० तासांचा वेळ शासकीय सेवेसाठी देत असतो. म्हणजे आपण कार्यालयामध्ये जास्त आणि कुटुंबात कमी वेळ असतो.

कुटुंबात कमी वेळ असूनही आपण सर्व भूमिका प्रामाणिकपणे पार पाडत असतो. अर्थात यात आपली भावनिक गुंतवणूक असते. हे माझे काम नाही असे घरात कधीच म्हटले जात नाही. असे म्हणायचे नसते, हे संस्कार आपण पुढील पिढीवर करत असतो. तिथे हे माझेच काम आहे असा सकारात्मक विचार आपण करत असतो. हाच सकारात्मक दृष्टिकोन शासकीय सेवेत म्हणजेच जिथे आपण आपला जास्त वेळ देत असतो, तिथे ठेवला पाहिजे. त्याने आपली नक्कीच प्रगती होऊ शकेल. आपला उत्साह वाढेल, कोणतेही काम कंटाळवाणे होणार नाही.

आपण दोन कुटुंबात वावरत असतो. एक भावनिक आणि दुसरे व्यावहारिक कुटुंब. दोन्ही कुटुंबे परस्परावलंबी आहेत. दोन्हीकडील भूमिकांना अगदी १०० टक्के नाही; पण जितका जास्त जमेल तेवढा न्याय देण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे, ही भावना सतत मनात रुजत राहिली. हे माझे काम नाही, या भावनेला मी माझ्याकडे कधी फिरकूच दिले नाही. याच प्रयत्नातून माझी जडणघडण होत गेली. त्यातूनच माझ्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत गेला.

(आपलं मंत्रालय जानेवारी २०१८ मधून पुनर्मुद्रित.)

**(निवृत्त अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग)**

**दृश्यकला क्षेत्रातील अक्षरलिपीशास्त्राच्या शेवट नसलेल्या मार्गावरील पथदर्शक अशोक परब नावाचा 'माईल स्टोन' आहे. प्रचलित अभ्यासक्रमात जर अशा पथदर्शकाचा समन्वय आला, तर ध्येयपूर्तीचं ठिकाण अजून किती दूर आहे? हे अभ्यासक दृश्यकला विद्यार्थ्यांना समजण्यास मदतच होते.**


# अक्षर जगताचे अनभिषिक्त सम्राट

# अशोक परब

**प्रा.डॉ. गजानन शेपाळ**

कोणतीही योजना अमलात आणायची असल्यास, जर त्या योजनेत सहभागी असणाऱ्या सज्जनांची एकमेकांशी किमान प्राथमिक ओळख जरी योजना राबविणाऱ्या प्रमुखाने करवून दिली, तरी प्रस्तावित योजना यशस्वीपणे पार पडेल, हे कथन करण्यासाठी कुण्या ज्योतिषाची आवश्यकता पडत नाही. कारण योजनाकर्त्याने योजना राबविण्याअगोदर योजनेतील सहभागींमध्ये सुरुवातीलाच एक सुसंवाद घडवून आणलेला असतो आणि असे जर योजनाकर्त्याने घडवून आणले नाही, तर मात्र मग 'टीचर मॅड अन् त्याचा फॉलोअर स्टुडंट पण मॅड' होण्याची वेळ येते, हेतू कितीही नीट असले, तरी त्यांचे म्हणणे हेतूंचे अन्वयार्थ, रसभरीत होतात.

मागच्या सप्ताहात आमच्या, सर ज. जी. उपयोजित कला महाविद्यालयात, आमच्या योजना प्रमुखाने दृश्यकला क्षेत्रातील दिग्गज अशा दोन व्यक्तिमत्त्वांची ओळख करून देण्यासाठी मला त्यांच्या दालनात बोलावले. त्या दोघांपैकी एक दिग्गज गोपी कुकडे आणि दुसरे अशोक परब. योजना अशी की, आम्ही या दृश्यकला शिक्षण क्षेत्रातील अध्यापक आणि ही दोघं, दृश्य कला क्षेत्राच्या व्यावसायिक क्षेत्रातील अनुभवी! जेव्हा दृश्यकला शिक्षक आणि दृश्यकला व्यावसायिक या दोघांच्या अनुभवातून निर्माण केलेली, विद्यापीठीय अभ्यासक्रमातील स्वाध्यायिका, संबंधित वर्गातील दृश्यकला विद्यार्थ्यांमध्ये राबवली म्हणण्यापेक्षा साजरी केली, तर इतक्या सुंदर-प्रभावी संवादाचे रूपांतर सुसंवादामध्ये परावर्तित होते. तो सुसंवाद एका आरोग्यदायी संकल्पनात रूपांतरित होतो. त्यालाच आपण इंग्रजीत 'हेल्दी कम्युनिकेशन डिझाईन' असे म्हणतो.



उपरोक्त उल्लेखलेल्या दोन दिग्गजांपैकी, आपल्या आजच्या लेखाचे महानायक आहेत. 'अशोक लिपी शाळा' या संस्थेचे संस्थापक, अक्षर जगताचे अनभिषिक्त सम्राट अशोक परब! अत्यंत साधी राहणी, अंगकाठीही फारच नगण्य, जोपर्यंत बोलणं होत नाही, तोपर्यंत सर्वकाही सामान्य! समोरच्याला काहीच अंदाज बांधता येत नाही. श्रीमान अशोक परब हेच एक 'कम्युनिकेशन' आहे, 'संवाद' आहेत. सुरुवातीला साधी राहणी अवलंबिलेला हा माणूस किती असाधारण आहे, हे समजतं. अंगकाठीने नगण्य भासणारा हा माणूस लिपीशास्त्राच्या अक्षर जगताचा 'सम्राट' आहे हे कळतं. अक्षरलिपीमध्ये इतरही अनेक नावे असतील. अशोक परब नावाचा 'माईल स्टोन', दृश्यकला क्षेत्रातील अक्षरलिपीशास्त्राच्या शेवट नसलेल्या मार्गावरील पथदर्शकच मानावा लागेल.

प्रचलित अभ्यासक्रमात जर अशा पथदर्शकाचा समन्वय साधला, तर ध्येयपूर्तीचं ठिकाण अजून किती दूर आहे? हे अभ्यासक दृश्यकला विद्यार्थ्यांना समजण्यास मदतच होते. अक्षर जगताच्या या सम्राटाची मूळ संशोधकवृत्ती असल्याने आणि जन्माने भारतीय असल्याने भारतीय लिपींचा अभ्यास सुरू केला. जेव्हा एखाद्या गोष्टीचा ध्यास घेतला जातो, तेव्हाच काहीतरी देदीप्यमान कार्य घडतं. या क्षेत्राचे अध्वर्यू जगप्रसिद्ध लिपिशास्त्रज्ञ 'आरके' अर्थात र. कृ. जोशी यांचा वसा पुढे चालू ठेवणारे अशोक परब यांनी भारतीय लिपींपैकी अनेक उपलब्ध लिपींचा अभ्यास केला. आपल्यासाठी ज्ञात नसलेल्या लिपी कुठे-कुठे शोधल्या. त्यांची प्रकृती तपासण्याचा प्रयत्न तर थक्क करणारा आहे. म्हणजे त्या लिपीतील अक्षरे, त्यांची वळणे, त्यांचे आकार, त्यातून तयार झालेले शब्द, त्या शब्दांचे आशय, उच्चार.... बापरे! *धन्य आहेत अशोक परब.*

हे सारं कमी की काय? 'आधी केले मग सांगितले' या उक्तीप्रमाणे आणि 'शहाणे करून सोडावे' या न्यायाने, आपण जे शिकलोय, आपण जे ज्ञान मिळविले आहे, ते इतरांना-इच्छुक विद्यार्थ्यांना लाभावे, म्हणून त्यांनी 'अशोक लिपी शाळा' नावाने एका संस्थेची स्थापना केली. सुमारे एक तपाहून अधिक काळ अशोक यांनी 'भारतीय लिपी'च्या क्षेत्रात विस्तृत संशोधन केले आहे. कुठल्याही 'पीएचडी'पेक्षा कमी नसलेल्या त्यांच्या या संशोधनात, विविध भारतीय भाषा, त्यांचा वारसा, त्यांची प्राचीन आणि आधुनिक उत्क्रांतीबद्दल माहिती त्या माहितीचे दस्तऐवजीकरण, त्यासाठी प्राप्त झालेले संदर्भ आणि या साऱ्या अमूल्य खजिन्याचे महत्त्व विशद करून त्याबद्दल जागरूकता निर्माण करणे, हे कार्य त्यांच्या संस्थेमार्फत ते करतात.

हे कार्य करण्याचं त्यांचं माध्यम म्हणजे प्रभावी सादरीकरण, कार्यशाळा आणि व्याख्याने होय. अशा या व्यक्तीच्या नावावर अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पुरस्कार आहेत. त्यांच्या माहितीचा स्वतंत्र लेख व्हावा, एवढं त्यांचं योगदान आहे. आज त्यांच्या

'अशोक लिपी शाळे'मध्ये, जगभरातील अनेक जणांनी प्राचीन आणि भारत आधुनिक भारतीय लिपी शिक्षण घेतलेले आहे आणि सध्याही शिकत आहेत. त्यांच्या या लिपी शाळेद्वारे शिकविल्या जाणाऱ्या भारतीय लिपींपैकी, काही नावे पाहिली, तरी अद्भुत जिज्ञासा, उत्सुकता निर्माण होईल, यात संदेह नाही. भारतातील सर्वात जुनी लेखन पद्धत विकसित झाली, ती 'ब्राह्मी' लिपी. म्हणजे 'खरोष्टी' लिपी वगळता भारतीय-सर्व लिपींची 'ब्राह्मी' लिपी पूर्वज लिपी आहे. त्या लिपीबद्दल 'अशोक लिपी शाळे'त शिकविले जाते. काश्मीरची साहित्यिक लिपी, जी तेथील प्रमुख शिलालेखांद्वारे समजली आणि जी 'ब्राह्मी' लिपीतूनच आली आहे.

ती 'शारदा' लिपी या शाळेत अभ्यासता येते. 'खरोष्टी' लिपीदेखील येथे शिकता येते. 'खरोष्टी' लिपी इ.स.पूर्व ४०० ते इ.स.पूर्व ३००च्या दरम्यान गांधार प्रदेशात वापरात होती. ही लिपी उजवीकडून डावीकडे लिहिली जाते. 'पल्लव' लिपीपासून निर्माण झालेली 'ग्रंथ' लिपी या संस्थेत शिकता येते. 'ग्रंथ' लिपी विशेषतः तामिळनाडू आणि केरळमध्ये आढळते, तामिळनाडूतील संस्कृत ग्रंथ याच लिपीमध्ये लिहिलेले आहेत. मराठा साम्राज्याची अधिकृत लिपी 'मोडी'! 'मोडी' लिपी प्रामुख्याने मराठी लिहिण्यासाठी वापरली जाते. ही सुंदर कलात्मक लिपी म्हणजे ऐतिहासिक खजिनाच आहे. या लिपीतील अनेक दस्तऐवज १९१७ नंतर देवनागरी लिपीत बदलण्यात-अनुवादित करण्यात आले. 'मोडी' लिपीही 'अशोक लिपी शाळे'त अभ्यासता येते.

भारतातील सिक्कीम राज्याची अधिकृत भाषा असलेली 'नेवारी' ही १४ ते १८व्या शतकापर्यंत, नेपाळ या राष्ट्राची प्रशासकीय भाषा होती. या 'नेवारी' लिपीला 'नेवार' किंवा प्रचलित 'नेपाळाक्षर'असेही म्हणतात. ही लिपी या संस्थेत शिकता येते. भारतीय लेखन परंपरेला हडप्पा उत्खननादरम्यान सापडलेल्या 'ब्राह्मी'तील पुराव्यांवरून ध्यानात येते की, तब्बल ५००० वर्षांपूर्वीचा इतिहास आहे. लिपी आणि लेखन प्रणाली ही, प्रत्येक सभ्यतेचा एक महत्त्वाचा भाग आहे. हे 'अशोक लिपी शाळा' शिकवते. हे आणि या लिपिशास्त्राचे प्राचीनत्व शोधण्यासाठी या 'सम्राट अशोका'ने त्याचं क्षेत्र अश्वमेधाच्या वारुप्रमाणे सीमेपलीकडे व्यापलं आहे. त्यांनी त्यांच्या प्रवासात अनेक संग्रहालये, डोंगरमाथे गुहा, मंदिरे, मशिदी, प्रख्यात अभिलेख अगदी दुर्मीळ सुंदर, प्राचीन हस्तलिखित आणि शिलालेख यांची माहिती घेत अविस्मरणीय अनुभव घेतले.

आपल्यातील अनेकांना मूळ आणि रोमन (लॅटिन) पलीकडे लिपी माहीत नसते, ही त्यांना खंत वाटते. त्यातूनच वर उल्लेखलेल्या काही लिपींसह विविध लिपींची माहिती भारतीय क्षेत्रातील अशोक परब यांनी आधुनिक जगताला उपलब्ध करून दिली आहे.

या लेखाचे शब्दांकन करत असताना या व्यक्तीचे आडनाव परब आहे, हे मी विसरूनच गेलो होतो. अशा या सम्राटाला दृश्य कला क्षेत्रात जाहिरात व्यावसायिक, व्हिज्युअल कम्युनिकेशन डिझायनर, दृश्यकला शिक्षक, कलाकार आणि उत्साही प्रवासी या विशेषणांनी ओळखले जाते. इतक्या मोठ्या जगप्रवासी लिपी अभ्यासकाची माहिती एका लेखात समाविष्ट करणं केवळ अशक्य आहे, त्यांच्या पुढील प्रवासासाठी आणि अभ्यासासाठी त्यांना अनेक शुभेच्छा!

**(सर जे.जे.कला महाविद्यालय, मुंबई.)**

## ।। श्री गणेश स्तुती ।।



श्री गणराया गजवदना तुज वंदितो मोरया ।।धृ।।
कुमकुमतिलक दुर्वांकुर चरणी अर्पितो अनंता
भक्तीची ओंजळ वाहतो कीर्ती तुझी गातो
मोदक फळाहार विविध नैवेद्य प्रेमे अर्पितो
जास्वंदी, केवडा, शमीपत्रे फुल राशी तुज मोरया ।।१।।

विविध अलंकार भूषणे तुज शोभती गौरीपुत्रा
वस्त्रालंकारे खुलले श्रीमुख जगताचा तू त्राता
सानथोर गाती आरती विघ्ने दूर करी भालचंद्रा
मंगलमूर्ती पाहीन आदरे, आनंदे कृपाछत्र शिरी धरा ।।२।।

विद्यारूपी धन अर्पि सकल जना देवा विनायका
सद्बुद्धी, सद्भाव देई भक्तजना देवा जगदीशा
भक्तरक्षणा धावून येशी सिद्धिविनायका
धनधान्य, संपती याची करी बरसात मयूरेशा ।।३।।

अक्षय सुखाचा भंडारा उधळी विश्वंभरा
भक्तांना सदैव तव चरणी ठेवी एकदंता
करुणामय वरद विराटा तुझी छाया देई बाप्पा
विसर न व्हावा कधी तुझा हीच आस गणेशा...

**- शैलजा सकपाळ (निवृत्त मुख्याध्यापिका)**






# अभिजात मराठी भाषा सप्ताह

प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने भाषेची प्राचीनता, मौलिकता आणि सलगता, भाषिक आणि वाङ्मयीन परंपरेचे स्वयंभूषण इ. निकष विचारात घेऊन तयार केलेल्या मराठी भाषा अहवालाची महाराष्ट्र शासनातर्फे केंद्र शासनाकडे शिफारस करण्यात आली. त्या अनुषंगाने केंद्रीय मंत्रिमंडळाच्या दिनांक ०३.१०.२०२४ रोजी झालेल्या बैठकीत मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय झाला.

मराठी भाषेला अभिजात दर्जा देताना मराठी भाषेची गेल्या सुमारे २५०० वर्षांची परपंरा गृहीत धरण्यात आली आहे. प्राचीन ग्रंथांची विविध लिपीतील भाषा, व्यवहारातील व विविध कला प्रकारातील भाषेच्या उपयोगाची गौरवशाली परपंरा विविध समाजघटकांसमोर येण्यासाठी मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, भाषेचे संवर्धन होण्यासाठी, जनमानसामध्ये मराठी भाषेच्या अभिजाततेची ओळख व्हावी, अभिजात मराठी भाषेसंदर्भातील संशोधन, जनजागृती जास्तीत जास्त व्हावी, याकरिता प्रतिवर्षी दिनांक ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा दिवस व दिनांक ३ ते ९ ऑक्टोबर २०२५ हा कालावधी अभिजात मराठी भाषा संप्ताह म्हणून साजरा करण्याचा निर्णय दिनांक २१ जुलै २०२५ च्या शासन परिपत्रकान्वये घेण्यात आला आहे.

अभिजात मराठी भाषा दिवस आणि अभिजात मराठी सप्ताहामध्ये राज्यस्तरीय उपक्रम, बृहन्महाराष्ट्रीय उपक्रम आणि जिल्हा, तालुका व ग्रामस्तरीय कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.

राज्यस्तरीय उपक्रमांतर्गत अभिजात मराठी भाषा दिवसाचे औचित्य साधून विविध ग्रंथांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. तसेच ऑनलाइन मराठी : दशा आणि दिशा, अभिजात मराठी भाषेबाबत महाराष्ट्र शासनाच्या भविष्यातील योजना या विषयांवर परिसंवाद आयोजित करण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त ११ भारतीय अभिजात मराठी भाषेच्या तज्ज्ञ मंडळींची संमेलनेही आयोजित करण्यात येणार आहेत. राज्यातील मराठी भाषा अधिकाऱ्यांसाठी दोन दिवसांचे राज्यस्तरीय संमेलन करण्याचे प्रस्तावित आहे.

यु-ट्यूब चॅनेलवर ऑनलाइन पद्धतीने ३ ते ९ ऑक्टोबर या कालावधीत अभिजात भाषा, मराठी भाषेची उत्पत्ती, नव्या पिढीची मराठी भाषा अशा विविध परिसंवादांचे आयोजन करण्यात येणार आहे. बृहन्महाराष्ट्रस्तर, ६० बृहन्महाराष्ट्रीय मंडळे त्यांच्या स्तरावर, तर १७ देशांमध्ये उपसमन्वयक कार्यक्रम आयोजित करतील. जिल्हा, तालुका, ग्राम व नगरस्तरावर अभिजात मराठी सप्ताहामध्ये मराठी भाषा संदर्भात विविध कार्यक्रम, प्रदर्शने, प्रश्न मंजुषा; तसेच अन्य नावीन्यपूर्ण उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

**टीम आपलं मंत्रालय**

**‘आपलं मंत्रालय’ या मासिकातील ‘वेगळ्या वाटा’ या सदरातून शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या पाल्यांनी विविध क्षेत्रांमध्ये मिळवलेल्या उल्लेखनीय यशाचा आढावा घेतला जात आहे. या माध्यमातून आज आपण अशा व्यक्तिमत्त्वांशी संवाद साधणार आहोत, जे तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, मेंदूशास्त्र, मानववंशशास्त्र आणि भारतीय ध्यान परंपरा या पाच वेगवेगळ्या शास्त्रांचा बहुआयामी अभ्यास करत आहेत. या मुलाखतीत आपण सुरुवातीला प्रत्येक शास्त्राची थोडक्यात ओळख करून घेणार आहोत.**

# वेगळ्या वाटा

**योगेश्वर जोशी**

### १) मनाच्या अभ्यासाकडे आकृष्ट होण्यामागे नेमकी प्रेरणा काय होती?

मनाच्या अभ्यासाकडे आकर्षण हे कुठेतरी बालपणातच रुजलेलं आहे. लहानपणी माझं मन थोडंसं अस्थिर होतं. विशेषतः राग खूप जोरात आणि तीव्रतेनं यायचा. एकदा समुपदेशक मला मनाचे श्लोक वाचायला सुचवलं होतं. ते मी फारसं पाळलं नाही; पण तेव्हा पहिल्यांदा ही जाणीव झाली की, आपल्याला मनावर काम करायची गरज आहे. शाळेत मराठी माध्यमातून शिक्षण घेताना मला मराठी विषय विशेष प्रिय होता, त्यातली संतवाणी ही तर फारच आवडती. संतवाणीतून अध्यात्माची आणि मन:शक्तीच्या शुद्धीकरणाची गोडी लागली. एकप्रकारे तेच मला mind training वाटायचं. नंतर अकरावी-बारावीला तत्त्वज्ञान विषय शिकायला मिळाला आणि त्या आवडीला अजून दिशा मिळाली. स्वामी विवेकानंदांचं वाक्य The difference between an ordinary man and an extraordinary man lies in the degree of concentration मला फार प्रभावी वाटलं. त्यानंतर विवेकानंदांचं राजयोग, पतंजली योगसूत्र यांचं वाचन सुरू झालं. त्यामुळे माझ्या एकाग्रतेचा, मनाच्या स्वभावाचा अभ्यास अधिक खोल होत गेला. खरा टर्निंग पॉइंट आला मास्टर्समध्ये बौद्ध तत्त्वज्ञान वाचताना, जेव्हा मी पाली कॅनॉन विशेषतः दिघनिकाय आणि बुद्धाची प्रत्यक्ष वचने अभ्यासायला सुरुवात केली. तिथे मला असं जाणवलं की, बालपणात रोवलेलं बीज आता एक सुस्पष्ट अभ्यासाचं झाड झालं आहे.



### २) (तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, न्यूरोसायन्स) इ. विषयातील समाकलन करण्याची गरज कशी जाणवली?

लहानपणी मला गणित आणि विज्ञानासारखे विषय कळतही नव्हते आणि आवडतही नव्हते; पण भाषांमध्ये आणि विशेषतः मराठीमध्ये रस होता. त्यामुळे अकरावी-बारावीत मी आर्ट्‌सला वळलो. तिथेच मला तत्त्वज्ञान या विषयाची ओळख झाली आणि मला समजलं की, Philosophy is considered the mother of all sciences.

तत्त्वज्ञान हे जीवन, आत्मा, सृष्टी, देव, ज्ञान, अस्तित्व अशा मूलभूत प्रश्नांचा शोध घेणारं शास्त्र आहे आणि त्या प्रश्नांची उत्तरं शोधताना आपोआपच इतर शास्त्रांत उतरावं लागतं. उदाहरणार्थ, आत्मा आहे की नाही? यासारख्या प्रश्नाच्या संदर्भात अनेक तत्त्वज्ञ Out of Body Experience ची संकल्पना देतात. या संकल्पनेचा अभ्यास मेंदूशास्त्र, मानसशास्त्र, तंत्रज्ञान या शाखांतून केला जातो. त्यामुळे तत्त्वज्ञानाचं सम्यक आकलन करण्यासाठी ही सर्व क्षेत्रे समजून घ्यावी लागतात.

चांगलं तत्त्वज्ञान समजून घेण्यासाठी इतर ज्ञानशाखांचं सखोल ज्ञान गरजेचं असतं. त्याचबरोबर जेव्हा एखाद्याला खऱ्या अर्थानं एखाद्या विषयाची आवड निर्माण होते, तेव्हा इतर विषयांबद्दल कुतूहल आणि जिज्ञासा तयार होते.

माझा स्वत:चा प्रवास असाच आहे. दहावीपर्यंत मी विज्ञानापासून दूर, पण आता मेंदूशास्त्र, मानसशास्त्र यासारख्या शाखांचे टॉप लेव्हल स्टडीज करतोय. हे सर्व एकमेकांशी जोडलेलं आहे, असे मला वाटतं.

### ३) आपल्या मते मन म्हणजे नक्की काय?

हा प्रश्न आजचा नाही. गेल्या दीड–दोन हजार वर्षांपासून जगातल्या सगळ्याच संस्कृतींमध्ये, सगळ्या विद्याशाखांमध्ये या प्रश्नावर विचार झालेला आहे. Philosophy of Mind. या शाखेचा मूलभूत प्रश्नच हा की, मन म्हणजे नेमकं काय? माणसाचं मन म्हणजे केवळ मेंदूतून निर्माण होणारी एक यंत्रवत प्रक्रिया आहे का? की त्याच्या पलीकडे काहीतरी अजून खोल, अजून सूक्ष्म आहे?

वेदांत मन आणि आत्म्याचं नातं उलगडताना मनाला मायेचा भाग मानलं जातं. न्याय आणि वैशेषिक मनाला इंद्रियांच्या पलीकडे जाणारी एक सूक्ष्म यंत्रणा मानतात. प्रत्येक दर्शन, प्रत्येक परंपरा मनाचा अर्थ थोडासा वेगळा सांगते; पण सगळ्यांचा केंद्रबिंदू एकच – स्वतःला ओळखणं.

### ५) संज्ञानात्मक विज्ञानामध्ये 'mind' आणि 'brain' यामधील संबंध कसा समजावला जातो?

संज्ञानात्मक विज्ञान (Cognitive Science) हे एक आंतरशाखीय क्षेत्र आहे, जे मनाच्या स्वरूपाचा अभ्यास करते. यात मानसशास्त्र, संगणकविज्ञान, मेंदूशास्त्र, मानवशास्त्र आणि तत्त्वज्ञान यांचा समावेश होतो. प्रत्येक शाखा मनाकडे वेगळ्या दृष्टीने पाहते : कंप्युटर सायन्स मनाला माहिती प्रक्रिया करणाऱ्या यंत्रणेसारखं पाहतं (जसं सॉफ्टवेअर–हार्डवेअरचं नेटवर्क). न्यूरोसायन्स मन हे मेंदूतील न्यूरॉन्सच्या कार्यावर आधारित असतं, असं मानलं जातं. मानवशास्त्र मनाच्या संकल्पनेचा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक विकास पाहतं.

तत्त्वज्ञान मात्र अजूनही विचारतं मन म्हणजे नक्की काय?

या सर्व शाखा मिळून मनाचा अधिक सखोल आणि समग्र अभ्यास करण्याचा प्रयत्न करतात. मन हा एकच विषय असूनही, त्याचे पैलू आणि समज विविध क्षेत्रांतून वेगवेगळ्या पद्धतीने उलगडले जातात.

### ५) तत्त्वज्ञान आणि न्यूरोसायन्स एकमेकांना पूरक ठरू शकतात का? आपण या दोघांमध्ये काय पूल बांधता?

तत्त्वज्ञान आणि न्यूरोसायन्स हे एकमेकांना पूरक आहेत. पश्चिमेत 'न्यूरोफिलॉसॉफी' या नव्या शाखेच्या माध्यमातून या दोन्हींचा समन्वय साधला जातो. हे तत्त्वज्ञान न्यूरोसायन्सवर आधारित असतं. थॉमस मेट्झिंगर, चर्चलँड दाम्पत्य आणि अलीकडे निधन झालेले डॅनियल डॅनिट यांनी विज्ञानाधारित तत्त्वज्ञान विकसित केलं आहे. त्यांनी वैज्ञानिक संशोधनाच्या आधारावर मन, अनुभव आणि चेतनेबद्दल नवीन तत्त्वज्ञान मांडलं आहे.

### ६) विविध पारंपरिक ज्ञानप्रणाली (उदा. भारतीय ध्यान परंपरा) आणि आधुनिक विज्ञान यामध्ये संवाद शक्य आहे का?

होय, आणि आज त्यावर जगभरात सखोल काम सुरू आहे.

या परस्पर संवादाला Contemplative Science असं म्हणतात. म्हणजेच ध्यान, अंतर्मुखता आणि आत्मपरीक्षण यांचं वैज्ञानिक अध्ययन. या क्षेत्रात भारतीय ध्यान परंपरा आणि पाश्चात्त्य न्यूरोसायन्स व मानसशास्त्र यांचं एकत्र संशोधन सुरू आहे. यासाठी Mind and Life Institute ही आंतरराष्ट्रीय संस्था महत्त्वाचं काम करते. ही संस्था दलाई लामा आणि तत्त्वज्ञ फ्रान्सिस्को वेरेला यांनी १९९० साली स्थापन केली.

ध्यान किंवा योग साधनेमुळे मेंदूच्या संरचनेत बदल घडतो, हे संशोधनातून सिद्ध झालं आहे. इमोशनल इंटेलिजन्ससारख्या संकल्पनाही याच संवादातून विकसित झाल्या असून, डॅनियल गोलमन यांसारख्या मानसशास्त्रज्ञांनी भारतीय परंपरेचा अभ्यास यासाठी केला.

### ७) आजच्या संशोधनात तुम्हाला सर्वात मोठं आव्हान काय वाटतं वैचारिक की तांत्रिक?

भारतातील संशोधनात प्रमुख अडचणी म्हणजे तरुण संशोधकांना सेटल होण्यातली अडचण म्हणजे तणाव आणि जबाबदाऱ्या; तसेच तांत्रिक सुविधा व प्रशिक्षणाचा अभाव. एआय–साहाय्यक तंत्रज्ञानाचा पुरेसा वापर न होणं आणि संशोधन सादर करण्याचे कौशल्य न मिळणंदेखील आव्हान आहेत. वैचारिक स्तरावर, भारतीय ज्ञानपरंपरेचा विसर आणि पश्चिमेच्या प्रभावाखाली असणं ही मोठी अडचण आहे, यावर काम करून त्या परंपरांना नवचैतन्य देण्याची गरज आहे.

### ८) आपल्या अभ्यासप्रवासात कोणत्या लेखकांनी किंवा विचारधारांनी आपल्यावर खोल परिणाम केला?

भारतीय विचारपरंपरेत मन, ज्ञान, आणि तर्कशास्त्र यांचा सखोल अभ्यास आहे, जो माझ्या संशोधनाचा आधार ठरला. स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी आणि जे. कृष्णमूर्ती यांचे विचार वैयक्तिक व वैचारिक प्रेरणादायी ठरले. पश्चिमेकडील इवान थॉमसन यांचा विशेष प्रभाव असून, त्यांनी भारतीय व पाश्चात्त्य तत्त्वज्ञान आणि आधुनिक विज्ञान यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या संशोधनातून तत्त्वज्ञानाकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहण्याची नवी दिशा मिळते.

### ९) संज्ञानात्मक विज्ञानात रुची असणाऱ्यांना काय सल्ला द्याल?

कॉग्निटिव सायन्स म्हणजे संज्ञानात्मक विज्ञान हे एक इंटरडिसिप्लिनरी क्षेत्र आहे. ज्यामध्ये तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, जीवशास्त्र, संगणकशास्त्र आणि समाजशास्त्र यांचा समावेश होतो. भारतात undergraduate स्तरावर या विषयांचे कोर्सेस कमी आहेत. त्यामुळे ज्यांना या क्षेत्रात सखोल अभ्यास करायचा असेल त्यांना मास्टर्स स्तरावर शिकावं लागतं. मात्र संबंधित शाखांमध्ये (जसे की इंजिनीयरिंग, आर्ट्स, बायोलॉजी) विद्यार्थी पुढे येऊन संज्ञानात्मक विज्ञानात काम करू शकतात. महत्त्वाचं म्हणजे एखाद्या विषयात मनापासून रस ठेवणं आवश्यक आहे; जसं–जसं तुमचे ज्ञान वाढतं, तसा तुमचा मार्गही स्पष्ट होतो. अभ्यासासाठी युवल नोआ हरारी आणि डॅनियल कन्हेमन यांसारख्या विचारवंतांचे ग्रंथ वाचण्याचा मी नक्कीच सल्ला देऊ शकतो. कारण त्यांच्या कामातून संज्ञानात्मक विज्ञानाचे नीट आकलन होऊ शकते.

एकंदरीत या क्षेत्रात रस आणि सातत्य महत्त्वाचे असून योग्य मार्गदर्शन व संसाधने मिळाल्यास संपूर्ण अभ्यासक्रमातून चांगले ज्ञान मिळवता येऊ शकते.

**शब्दांकन/मुलाखत : अश्विनी पुजारी,**
सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय



# चला गं, सखी खेळू या...

**वृक्षाली वसंतराव बर्गे**

झिम्मा, फुगडीसारखे खेळ शारीरिक व्यायामाची उत्तम उदाहरणे आहेत. शारीरिक व्यायामाबरोबरच रोजच्या रहाटगाडग्यातून स्त्रियांना या खेळामुळे थोडी उसंत मिळते व मनाला खूप मोठी उभारी मिळते. याबरोबर वेगवेगळे जाती-धर्म, गल्लीतला जिव्हाळा, सासुरवाशिणीचे दुःख, त्यातून जाच करणाऱ्यांची उडवली जाणारी खिल्ली, गावच्या पंचायतीपुढे न्याय मागणे अशा खूप गमतीजमती या खेळांमध्ये असतात. म्हणूनच सासुरवाशिणी माहेरच्या वाटेकडे डोळे लावून बसतात. गौरी-गणपती येण्याअगोदर किंवा नागपंचमीनंतर हे खेळ खेळायला सुरुवात केली जाते.

आई आणि मुलीचं नातं खूप वेळा या खेळातून बहरतं. कामाचा निपटारा करत असताना मुलीची आपल्याबरोबर वणवण नको व्हायला, म्हणून आई मुलीला वेगवेगळी कारणं सांगते, तरीही मुलगी आईची पाठ सोडत नाही.

*मुली मी बाजारला जाते,*
*आई मी येते.*
*देवळामागं चुणचुण खड*
*वाघ दड, खाईल तुला*
*खाऊ दे मला..... मुली मी बाजारला जाते,*
*आई मी येते.*

***लाटण्याचा खेळ***

*'लाटा बाई लाटा,*
*चंदनी पेटा मामांनी दिला मला,*
*सोन्याचा लोटा;*
*आई मी लहान, केतकीचं पान,*
*मामांना सांग मला, कंबरपट्टा'*
*नवीन लग्न झालेल्या माहेरवाशिणीला चिडवण्यासाठी,*

*'नवरा कुठं गेला?*
*म्हमईला गेला,*
*परत का गं आला?*
*करमत नाय त्याला,*
*आणलं काय तुला?*
*साडी, साडी तू काय दिलं त्याला?*
*ईश्श...... ईश्श...'*
*नवरा चांगला पण जाच करणारे*
*सासू-सासरे वाईट, मग ते असं म्हणायचं,*

*'सासूचं धुणं*
*साप साप साप,*
*सासऱ्याचं धुणं सापऽऽसापऽऽसाप,*
*नवऱ्याचं धुणं*
*सु सु सु*
*माझं धुणं खिसू खिसू खिसू...' पिंगा*

या कालावधीमध्ये महिला वर्ग म्हणजेच लहानापासून वृद्धांपर्यंत सर्व महिला या खेळात भाग घेतात. हे खेळ संध्याकाळी जेवणानंतर सर्व ठिकाणी खेळले जातात. गौरी-गणपतीच्या आगमनापासून ते विसर्जनापर्यंत सर्व महिला सजून विविध प्रकारची गाणी म्हणत हा सण साजरा करतात. तसेच या कालावधीत सर्व महिला मसालापान खाण्याचा आस्वाद घेतात. त्याचबरोबर या ३ दिवसांच्या कालावधीत विविध पदार्थ बनवले जातात. त्यामध्ये अळूवड्यांना जास्त महत्त्व असते. या सणात काही आवर्जून म्हणण्यात येणारी ही गाणी :

*'बंधू येईल माहेरी न्यायला*
*बंधू येईल माहेरी न्यायला,*
*गौरी-गणपतीच्या सणाला,*
*गाडी घुंगराची येईल न्यायला*
*गाडी घुंगराची येईल न्यायला,*
*गौरी-गणपतीच्या सणाला'...*

गौरी-गणपतीच्या सणाला एका गोष्टीची तीव्रतेने आठवण झाली, ती म्हणजे 'गौरीच्या पारंपरिक खेळाची'. ग्रामीण भागात किंवा शहरी भागातसुद्धा झिम्मा, फुगडी, गाठोडं, फेर, गोफ, सूप आणि घागर नाचवणे, खुर्ची का मिरची, किस बाई किस, कोंबडा, किकिच पान, दिंडा, सुपारी, काच किरडा, पकवा, पिंगा हे सर्व मंगळागौरीचे खेळ खेळले जातात.



## पिंगा

पिंगा पोरी पिंगा गं. पोरी पिंगा गं पोरी पिंगा गं पोरी पिंगा, तुझ्या पिंग्यानं मला बोलिवली, रात्र जागवली पोरी पिंगा; फेटा बांधल्याला भाऊ माझा गं. जावई तुझा गं पोरी पिंगा तुझ्या पिंग्यानं मला बोलिवली, झोप चाळवली पोरी पिंगा; शालू नेसल्याली बहीण माझी गं. सून तुझी गं पोरी पिंगा तुझ्या पिंग्यानं मला बोलिवली, मागं घालवली पोरी पिंगा: भाऊ माझा गं. तो बग राजा गं. अग जा जा गं पोरी पिंगा तुझ्या पिंग्यानं मला बोलिवली, मला बोलिवली पोरी पिंगा; तुझ्या भावाचं डोळं चकणं गं. रूप हेकणं गं पोरी पिंगा बहीण माझी गं लेक इंद्राची, कोर चंद्राची पोरी पिंगा.

*तुझ्या दारात मांडव घालतेच गं*
*कशी कशी घालतेस बघतेच गं,*
*तुझ्या दारात मांडव घालतेच गं*
*कशी कशी घालतेस बघतेच गं....'*

**गोफ**

*'गोफ विणू बाई गोफ विणू*
*अर्ध्या रात्री गोफ विणू,*
*गरे खा गरे, पोटाला बरे*
*न खाईल त्याची, म्हातारी मरे;*
*मेली तर मेली, कटकट गेली*
*संसाराला मोकळीक झाली..'*



*उखाणा*
*सुया बाई सुया पोलादी सुया*
*आम्ही दोघी फुगडी खेळू*
*नणंद भावजया*
*चिपाड बाई चिपाड जोधल्याचे चिपाड*
*दादांनी बायको केली*
*आमच्यापेक्षा धिपाड*

***गल्लीतला जिव्हाळा***

*हातात सूप घेऊन नाचत नाचत हे गाणं म्हणायचं, '*
*नाच गं घुमा ... कशी मी नाचू ?*
*नाचत नाचत गेले होते... कुणाच्या आळी ?*
*चिनग्याच्या आळी, शिलान वाढली आर्धी पोळी*
*संद्या दारात उभा गं, त्येनं माझा मोडला खुबा गं...*
*नाच गं घुमा... कशी मी नाचू ?*
*नाचत नाचत गेले होते... कुणाच्या आळी?*
*गवळ्याच्या आळी, शिलान वाढली आर्धी पोळी*
*सच्या दारात उभा गं,*
*त्येनं माझा मोडला खुबा गं*
*नाच गं घुमा... कशी मी नाचू ?*
*नाचत नाचत गेले होते... कुणाच्या आळी?*
*गवळ्याच्या आळी, शिलान वाढली आर्धी पोळी*
*संद्या दारात उभा गं, त्येनं माझा मोडला खुबा गं...*

अशी गल्लीतल्या सगळ्या मुलांची नावं घ्यायची. त्यामुळे गल्ली म्हणजे एक कुटुंब वाटायचं. या सगळ्यांमुळे या बायकांचा एकमेकींशी खूप जिव्हाळा वाढायचा. त्यामुळे एकमेकींच्या चेष्टामस्करी आणि हसण्याला एक उधाण यायचे. हातात सूप आणि कळशी नाचवत पुढचे गाणे म्हणायचे,

*'हातात पळी,*
*बायकू काळी*
*पुतळा चांबारीन तूच का गं, तूच का...?*
*मीच कि गं, मीच की... हातात चड्डी, बायकू गिड्डी*
*सुंदा धनगरीन तूच का गं, तूच का...?*
*मीच कि गं, मीच की...'*

*यापुढचा कहर काटवट काणा घालताना असायचा, '*
*काटवट काणा, चौघी सुना*
*सुतारणीबाईचा मोडला कणा'*
*कोणीच कोणाला कमी नसायच्या,*
*ठकास महाठक उत्तर तयार असायचं.*

*आंतरजातीय विवाह*
*एक आंतरजातीय विवाहाचं वर्णन खूप भारी आहे या खेळात*
*'आखडी घालू जकडी, पैंजाण पकडी,*
*सोबाण साडा, अमावस्या दिशी*
*गौराई धाडा, तिकडन आला, रोमोस खेकडा*
*त्येनं इकमत काय काय केली*
*गावची गुरुविन काढून नेली*
*हळद लावून पिवळी केली*
*बाशिंग बांधून नवरी केली करंगळीला धरून बावल्यानं नेली..'*

**कोंबडा**

एखादा अन्याय झाला तर पंचायत पुढं दाद मागायला त्या वेळची स्त्री घाबरत नव्हती. कोंबडा घालत ती म्हणायची,

'कु ...... कु.... च्या... कु..... (याचा आवाज एवढा मोठा की पलीकडच्या गल्लीत ऐकू गेला पाहिजे.)

माझ्या कोंबड्याचं पक, दारी जमल्यात लोक,
गावचा पाटील 'राजा' कोंबडा मारीला माझा
कु ...... कु.... च्या...... कु......'
राजाप्रमाणे न्याय दे मला, ठणकावून सांगत होती त्याला.

हा सगळा आनंदाचा माहोल सध्या हळूहळू हद्दपार होतोय. मात्र ग्रामीण भागात आणि अनेक शहरातही या 'पारंपरिक खेळांच्या भव्य स्पर्धांचं आयोजन केलं जातंय. या निमित्ताने का होईना, तरुणींना या संस्कृतीची, परंपरेची नव्याने ओळख होत आहे. हेही नसे थोडके.

(आपलं मंत्रालय सप्टेंबर २०१८ मधून पुनर्मुद्रित.)

*ज्ञानराज माझी योगियाची माऊली । जेणे निगमवली प्रकट केली ।। गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी ।*
*ब्रम्हानंद लहरी प्रकट केली ।। अध्यात्म विद्येचे दाविलेसे रूप । चैतन्याचा दीप उजळला ।।*
*छप्पन्न भाषेचा केलासे गौरव । भवार्णवी नाव उभारली ।। श्रवणाचे मिषे बैसावे येऊनी ।*
*साम्राज्य भूवनी सुखी नांदे ।। नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी एक तरी ओवी अनुभवावी ।।*


*– संत नामदेव*

# ज्ञानेश्वरी एक अद्‌भुत ग्रंथ

**केशव जाधव**

संत नामदेव म्हणतात, *नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवावी ।।* जन्माला येऊन ज्ञानेश्वरीतील एक ओवी जरी अनुभवली, तिची अनुभूती घेतली, तर जीवन सफल झाल्याशिवाय राहणार नाही, असा हा विश्वास संत नामदेवांनी या ओवीच्या माध्यमातून व्यक्त केलेला आहे. संत नामदेवांनी ज्ञानेश्वरीच्या वरील अभंगात केलेल्या वर्णनावरून ज्ञानेश्वरीचे महत्त्व अधोरेखित होते. ज्ञानेश्वरीमधील प्रत्येक ओवीमध्ये प्रचंड मोठी क्षमता आहे. वारकरी संप्रदायातील वैष्णव यावर यथार्थ विश्वास ठेवून ज्ञानेश्वरीचे पारायण करीत असतात. काहींना तर ज्ञानेश्वरी अगदी मुखोद्गत असते, परंतु पाण्याने भरलेली घागर डोईवर आहे; पण त्यातील पाण्याचा एकही थेंब तहानलेल्या मुखात जात नसेल तर त्या पाण्याची किंमत ती काय? या तत्त्वानुसार जर माऊलींच्या ओवीची अनुभूती आली नाही, तर या पाठांतराला किंमत शून्य!

माऊलींनी ज्ञानेश्वरी सांगितली, या घटनेला आता साडेसातशे वर्षे पूर्ण होत आहेत. असे असले, तरी ज्ञानेश्वरीमधील गोडवा दिवसेंदिवस वृद्धिंगतच होत चाललेला दिसतो. या उण्यापुऱ्या साडेसातशे वर्षांच्या कालावधीमध्ये लक्षावधी वारकरी, संत साहित्याचे अभ्यासक, विचारवंत माऊलींच्या या अनमोल ग्रंथाचा अभ्यास करत आहेत. व्यवहार, अध्यात्म, परमार्थ, विज्ञान, तत्त्वज्ञान इत्यादी विविध विषयांवर दैनंदिन जीवनातील उदाहरणे देत माऊलींनी समर्पक भाष्य आणि मार्गदर्शन करत हा ग्रंथ सजविला असल्याने ज्ञानेश्वरीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. वारकरी संप्रदायासाठी तर हा ग्रंथ म्हणजे जीव की प्राणच.



## पार्श्वभूमी

जेव्हा–जेव्हा धर्माची ग्लानी होईल आणि अधर्माची बजबजपुरी माजेल, त्या–त्या वेळी धर्माच्या रक्षणासाठी मी अवतार घेईन, असे भगवंताने आपल्या प्रिय भक्तजनांना आश्वस्थ केले आहे. गीतेतल्या चौथ्या अध्यायातला सातवा प्रसिद्ध श्लोक, 'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत...' हा श्लोक त्याची प्रचिती देतो. कौरवांनी माजवलेला अधर्माचा हाहाकार मोडून काढण्यासाठी भगवान पांडवांच्या भेटीला आले आणि त्यांनी पांडवांना या अधर्माचा नाश करण्यासाठी प्रेरित केले. पांडवांच्या युद्धसज्जतेसाठी सर्वतोपरी प्रयत्न केल्यानंतर कौरव–पांडवांचे धर्मयुद्ध निश्चित झाले; परंतु पांडवांचा आणि भगवंतांचासुद्धा, हुकमी एक्का असणारा अर्जुन युद्धभूमी कुरुक्षेत्रावर ऐनवेळी गलितगात्र झाला. त्याने युद्धास नकार दिला. ऐनवेळी उद्‌भवलेल्या या परिस्थितीमुळे युद्धभूमीवर सर्वत्र संभ्रमावस्था निर्माण झाली. जन्मांध असला तरी धर्म जाणून असणारा, परंतु पुत्रप्रेमाने मायेच्या मोहजाळात अडकून धर्माची साथ सोडणारा धृतराष्ट्र या परिस्थितीमुळे मनोमन खूश झाला होता; पण हे धर्मयुद्ध साकार करणे आणि अधर्माचा सर्वनाश करणे हेच अवताराचे उद्दिष्ट असल्याने भगवंतांनी अर्जुनाच्या मतपरिवर्तनासाठी त्याला उपदेश केला. तीच ही श्रीमद् भगवद्गीता. अर्जुनाला सर्वतोपरी समजावत १८ अध्यायात भगवंतांनी अर्जुनाला युद्धासाठी सज्ज होण्यास प्रवृत्त केले.

खरंतर महाभारत खरोखर घडलं आहे काय की, ते एक काल्पनिक महाकाव्य आहे, याबाबत वादविवाद आहेत, परंतु या महाघटनेत उल्लेखिलेल्या घटनांचे अनेक पुरावे आजही संशोधकांना उपलब्ध होत असल्याने ही घटना घडून गेलेली आहे, हे सिद्ध होत आहे. वादाचा भाग म्हणून क्षणभरासाठी ही घटना जरी काल्पनिक मानली तरी गीताकारांनी हे सर्व महानाट्य अत्यंत प्रभावीपणे साकारले असल्याचे दिसून येते.

अन्याय आणि कपट कारस्थानाने एखाद्याचे हक्क हिरावून घेणे, कपटाने सज्जनांचा नाश करण्याचा प्रयत्न करणे, दुर्बलांवर अहंगंडाने अत्याचार करणे, स्त्रियांचे चारित्र्यहनन करणे अशा अधर्माची जेव्हा परिसीमा होते, तेव्हा हा अधर्म मोडून काढण्यासाठी एक धर्मात्मा उदयाला येतो आणि तो हा अत्याचार, अन्याय मोडून काढतो आणि धर्माधिष्ठित व्यवस्था निर्माण करतो, अशा आशयाचे हे कथानक. कौरव हे या कथानकातील खलनायक. या कथानकाच्या माध्यमातून गीताकर्त्यांनी जीवनातील सत्य आणि धर्माचे महत्त्व अधोरेखित करताना व्यवहार, कर्मकांड, ज्ञान, विज्ञान, आत्मतत्त्व, परब्रह्मतत्त्व इत्यादी बाबींचा ऊहापोह करत वाचकांना, अभ्यासकांना जीवनाचे अंतिम ध्येय काय असावे, याबाबतचे उत्तम मार्गदर्शन केलेले आहे. जीवनाचे हे सर्वोत्तम ज्ञान असले तरी मूळ श्रीमद् भगवद्गीता हा ग्रंथ संस्कृत भाषेत असल्याने आणि हे ज्ञान गहन असल्याने ते सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत नव्हते, त्यांना आत्मसात करता येऊ शकत नव्हते. ज्ञानोपासक असणाऱ्या

माऊलींच्या ही बाब लक्षात आली आणि माऊलींनी या गहन ज्ञानाची कवाडे सर्वसामान्यांसाठी उघडावीत म्हणून वयाच्या अवघ्या १६व्या वर्षी गीतेवरील हा टीकाग्रंथ लिहिला. भावार्थदीपिका हे श्री ज्ञानेश्वरीचे मूळ नाव. यापूर्वी माऊलींनी अमृतानुभव किंवा चिद्‌विलासानंद तसेच चांगदेव पासष्टी हे ग्रंथ लिहिले होते. माऊली ज्ञानमार्गी असल्याने हे ग्रंथ ज्ञानोपासक साधकांच्या अभ्यासासाठी उत्तम ग्रंथ आहेत. हटयोगी असणाऱ्या आणि चौदाशे वर्षे वय असलेल्या संत चांगदेवांच्या उद्धारासाठी माऊलींनी ६५ अभंगांची रचना करून त्यांना उपदेश केला. अत्यंत कठोर साधक आणि उग्र हटयोगी असलेल्या चांगदेवांना चौदाशे वर्षांच्या साधनेत जे ज्ञान प्राप्त झाले नाही, ते माऊलींच्या या ६५ अभंगांतून त्यांना प्राप्त झाले आणि ते जीवनमुक्त होऊन गेले.

श्रीमद् भगवद्‌गीतेमध्ये एकूण १८ अध्याय आणि ७०० श्लोक आहेत. श्रीमद् भगवद्‌गीतेमध्ये जीवनाचं गहन तत्त्वज्ञान सांगितलेलं आहे. जीवाच्या अनेक दशा, जन्म आणि मृत्यूचे रहस्य, कर्मसिद्धांत, सांख्ययोग, बुद्धियोग, ध्यानयोग, कर्मसंन्यासयोग, ज्ञान विज्ञानयोग, विभूतीयोग, भक्तियोग अशा विविध मार्गाने आपल्या खऱ्या स्वरूपापर्यंत कसे पोहोचायचे, याबाबतचे मार्गदर्शन या ग्रंथामध्ये दिसून येते. हा ग्रंथ तत्कालीन विद्वानांची भाषा असणाऱ्या संस्कृतमध्ये आहे. जीवनाचं इतकं गहन ज्ञान या ग्रंथामध्ये आहे आणि तो संस्कृतमध्ये असल्यामुळे हे ज्ञान सामान्य जनांपर्यंत पोहोचत नाही, याची खंत माऊलींना होती. त्यामुळे ही ज्ञानाची कवाडं सर्वसामान्यांसाठी खुली व्हावीत, या उद्देशाने माऊलींनी वयाच्या १६व्या वर्षी श्रीमद् भगवद्‌गीतेवरील टीकाग्रंथ असणारा 'भावार्थदीपिका' हा ग्रंथ लिहिला. प्रत्येक श्लोकाचे यथोचित सोदाहरण स्पष्टीकरण करत असताना या ग्रंथाचा विस्तार थोडा वाढला आहे ७०० श्लोकांचे विश्लेषण करण्यासाठी माऊलींना नऊ हजारपेक्षा जास्त ओव्यांची रचना करावी लागली. प्रत्येक श्लोक आणि त्यामागील तत्त्वज्ञान हे जास्तीत जास्त सामान्य जनांपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने माऊलींनी विवेचन केले असल्याचे दिसून येते.

## तिमिरातून प्रकाशाकडे

अर्जुन हा निमित्तमात्र असून भगवद्‌गीतेचे ज्ञान हे जीवन मरणाच्या फेऱ्यांमधून जीवाला बंधमुक्त करण्यासाठी आहे. भगवद्‌गीतेचे वैशिष्ट्य असे आहे की, या ग्रंथाची सुरुवातच मुळी जन्मांध असलेल्या धृतराष्ट्राच्या श्लोकाने होते. धृतराष्ट्र हा जन्मांध असला तरी तो एक ज्ञानी पुरुष होता. पुत्रप्रेमाचा प्रमाद झाला आणि त्याला मायेने ग्रासले. तो अधर्माच्या वळचणीला गेला. पांडवांची बाजू सत्य आणि धर्माची असल्याचे तो जाणत होता. प्रत्यक्ष भगवान पांडवांच्या बाजूने उभे असल्याने या धर्मयुद्धात पांडवांचा विजय निश्चित आहे, असे त्याला मनोमन वाटत होते; परंतु दुर्योधनाच्या मोहापायी त्याला या धर्माच्या पक्षाला विरोध करावा लागला होता. त्यामुळे या धर्मयुद्धाची त्याला मोठी उत्सुकता लागून राहिली असल्याने त्याने आपल्या प्रिय सेवकाला, संजयाला, युद्धाचे वर्णन करण्यासाठी आपल्या कक्षात बोलावून घेतले होते. गीतेच्या पहिल्याच श्लोकात धृतराष्ट्र संजयला विचारतो, *धृतराष्ट्र उवाच ... धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे । समवेतां युयुत्सवा । मामका: पांडवाश्चैव । कीम कुर्वत: संजय: ।।*

जन्मांध धृतराष्ट्र युद्धाविषयीच्या आपल्या औत्सुक्यापोटी संजयाला विचारतो, हे संजया, पवित्र अशा या कुरुक्षेत्रावर पांडूचे आणि आमचे, म्हणजे कौरवांचे सैन्य युद्धासाठी जमले, त्याबाबतची मला माहिती सांग. पुढे मग संजय सर्व इतिवृत्तान्त धृतराष्ट्राला सांगत जातो. अर्जुनाने विचारलेले प्रश्न आणि भगवान श्रीकृष्णांनी त्याला दिलेली समर्पक उत्तरं असा हा श्री कृष्णार्जुन संवाद संजय जसाच्या तसा धृतराष्ट्राला वर्णन करत जातो. यावरून असे निदर्शनास येते की, जीवनाचे एवढे गहन तत्त्वज्ञान असलेल्या ग्रंथाची सुरुवातच मुळी जन्मांध व्यक्तीच्या विधानाने होते. गंमत म्हणजे विद्वान आणि ज्ञानी असलेल्या अर्जुनासारख्या महान व्यक्तिमत्त्वालाही मायेचा प्रमाद होतो आणि तो आपल्या कर्तव्यापासून विन्मुख होतो. याचाच अर्थ माया ही कोणाही पुरुषाला सहज आपल्या जाळ्यात ओढू शकते, हाच संदेश गीताकारांना या माध्यमातून द्यायचा आहे. या अध्यायात अर्जुनाला विषाद झाल्याचा प्रसंग असल्याने या अध्यायाला अर्जुन विषादयोग असे संबोधले आहे. अर्जुनाला या विषादग्रस्त स्थितीतून बाहेर काढण्यासाठी मग भगवान त्याला विविध मार्गाने उपदेश करत जातात. दुसऱ्या अध्यायात भगवंतांनी सांख्य तत्त्वज्ञानाचा उपदेश अर्जुनाला केला असल्याने या अध्यायाला सांख्ययोग म्हटले आहे. त्यामध्ये सांख्य तत्त्वज्ञानाबरोबरच कर्मयोग, बुद्धियोग याबाबतचे तत्त्वज्ञान; तसेच स्थितप्रज्ञाची संकल्पना अध्यायात मांडली आहे. पूर्ण समाधान न झाल्याने अर्जुन भगवंतांना आणखीन काही गोष्टी विचारत जातो आणि संभाषणाच्या ओघात भगवंत त्याला कर्मयोग, निष्काम कर्मयोग, ध्यानयोग, ज्ञान विज्ञानयोग, विभूतीयोग अशा विविध योग मार्गांचा उपदेश करतात. बाराव्या अध्यायात भगवंतांनी सर्वसामान्य साधकांना सुलभतेने साधता येईल, अशा भक्तियोगाचा उपदेश केला आहे. भगवद्‌गीतेच्या एकूण १८ अध्यायांमध्ये अशा प्रकारचे वेगवेगळे परब्रह्म प्राप्तीचे मार्ग सांगितलेले आहेत. हे ज्ञान मूलत: गहन असल्याने माऊलींनी प्रत्येक श्लोकामधील लपलेला अर्थ अत्यंत साध्या आणि सोप्या भाषेत दैनंदिन जीवनातील उदाहरणे देत आपल्या ओघवत्या शैलीत ओव्यांमधून उलगडला आहे. सामान्यातील सामान्य वाचक आणि साधक समोर ठेवून माऊलींनी सोप्या शब्दात ब्रह्मज्ञान उलगडून दाखवले असल्यामुळे या ग्रंथाला साधकांमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. माऊलींची रसाळ वाणी आणि ओघवती शैली यामुळे ग्रंथातील गोडवा अधिकच वाढला आहे.

## पर्यावरण आणि शेतीचे उपदेश

माऊलींनी ज्ञानेश्वरी लिहिताना परमार्थ ज्ञानाबरोबरच व्यवहारिक ज्ञानाच्या गोष्टीबाबतचे अनेक हितगुज केले आहेत. प्रेम आणि कनवाळूपणा हे माऊलींचे स्थायीभावच. त्यांच्या साहित्यकृतीतून त्यांचे हे भाव अगदी अनाहूतपणे समोर येतात. वृक्षराजींवर माऊलींचा विशेष जीव.

माऊली म्हणतात, *जो खांडावया घाव घाली । का लावणी जयाने केली । दोघा एकची सावली । वृक्ष दे जैसा ।।* वृक्ष लावणारा आणि घाव घालून वृक्ष तोडणारा या दोघांनाही वृक्ष समान सावली देतो हा निसर्गाचा गुण. मानव यामधून काही शिकेल का? झाडावर होणाऱ्या अत्याचाराकडे लक्ष वेधताना माऊली या ओवीत सांगतात की, *अजातशत्रू तरूवरा । सर्वांगी देवविलीया शिरा । ऐसे जीव घेऊनी धनुर्धरा । कोरडे केले ।।* अजातशत्रू असणाऱ्या या वृक्षवेलींना मानव प्राणी निर्गुणपणे छेद करत असतो आणि या वृक्षराजींचं शोषण करत असतो. कल्पतरू तोडोनि कंपु शेता .... असे म्हणत माऊली वृक्षतोडी करून त्या वृक्षांच्या लाकडाच्या साहाय्याने शेताला कुंपण घालणाऱ्या

प्रवृत्तीवरही आघात करतात. माऊली शेतामध्येही रमतात. अगदी गहनात गहन ज्ञान सामान्यातल्या सामान्य वाचकाला / साधकाला कळावे, यासाठी माऊली शेतातली अनेक उदाहरणे देत असतात. आता या ओवीतच पाहा...

*नाना कृषी वळू आपले । पांघरूनी पेरले । जैसे झाकी निपजले । दानपुण्य ।।*

दान हे सर्वात मोठे पुण्य आहे, परंतु आपण केलेले दान केलेल्या दानाचे आपण उदो उदो करत राहिलो, तर दानाचे पुण्य संपुष्टात आल्यावाचून राहणार नाही, त्या संदर्भात उदाहरण देताना माऊलींनी शेतकरी शेतात बीजपेरणी करण्याचे उदाहरण दिले आहे. माऊली सांगतात, शेतकरी ज्याप्रमाणे शेतामध्ये बीज पेरून झाल्यावर ते मातीने झाकून देतो. जेणेकरून हे बिजाचे दाणे पक्षी खाणार नाहीत आणि ती मातीमध्ये व्यवस्थित रुजली जातील. त्यापासून पीक निर्माण होईल आणि त्या पिकापासून हजारो पुन्हा दाणे पदरात पडत असतात; पण हे दाणे जर उघड्यावरच ठेवले त्याचा गजावाजा केला, तर मात्र हे दाणे बीज वाया जाईल आणि पदरात काहीही पडणार नाही, त्याप्रमाणे आपण केलेले पुण्य हे नेहमी झाकून ठेवावे, असा उपदेश माऊलींनी या ओवीमध्ये केला आहे

## जीवनाचे रहस्य आणि आत्म्याचे वैश्विकत्व

ज्ञानेश्वरीचा अभ्यास करत असताना माऊलींनी जीवनाची अनेक रहस्यं उलगडून दाखवलेली दिसतात. भगवंतांनी विविध १८ अध्यायांमध्ये जे-जे उपदेश केलेले आहेत, ते उपदेश दैनंदिन जीवनामध्ये कसे लागू पडतात, याचे सोदाहरण स्पष्टीकरण माऊलींनी ज्ञानेश्वरीत दिलेली आहेत. कर्माचा सिद्धांत सांगताना, कर्मापासून संचित निर्माण होते, संचिताचे प्रारब्ध होते आणि जीवाला या संचित आणि प्रारब्धामुळे पुन:पुन्हा जन्म घ्यावा लागतो. कर्मामुळे जन्ममृत्यूचे हे रहाटगाडगे अखंड फिरत राहते. माऊलींनी आपल्या ओघवत्या शैलीतील ओवीमध्ये स्पष्ट करताना सांगितले आहे, *उपजे ते नाशे । नाशले पुनरपी दिसे । हे घटिका यंत्र तैसे परिभ्रमे गा ।।* जसा दिवस उगवतो आणि मावळतो, पुन्हा उगवतो आणि मावळतो, त्याचप्रमाणे कर्मामुळे जीव मायेत बद्ध होतो आणि जन्म मृत्यूच्या रहाटगाड्यात फिरत राहतो. त्यातून सुटका करून घ्यायची असेल, तर निष्काम कर्माची कास धरावी, असे माऊलींनी दुसऱ्या अध्यायात सांगितले आहे.

आपल्या वारकरी संप्रदायी भक्तांना माऊलींनी बाराव्या अध्यायातील भक्ती योगामध्ये अनेक उपदेश केलेले आहेत. त्यामध्ये जीवाने व्यष्टीतून समष्टीत पोहोचण्यासाठी नामाची कास धरावी, असा उपदेश केला आहे. या अध्यायात माऊली वैश्विकतेचा दृष्टांत देताना अतिशय सुंदर वर्णन करतात, *हे विश्वची माझे घर । ऐसी मती जयाची स्थिर । किंबहुना चराचर । आपणची जाहला ।।* जेव्हा जीव मायेच्या कोशातून बाहेर पडतो, तेव्हा तो व्यष्टीतून समष्टीला पोहोचतो. हे संपूर्ण विश्वच माझं घर आहे आणि या संपूर्ण चराचरामध्ये मीच व्यापून राहिलेलो आहे, अशी जेव्हा अनुभूती येते, तेव्हा जीवाची मती स्थिर होईल आणि तो परब्रह्म स्वरूपाला नक्कीच पोहोचेल, याची खात्री माऊली देतात.

आज आपण विश्वगुरू होण्याची स्वप्नं पाहत आहोत. माऊलींनी साडेसातशे वर्षांपूर्वी विश्वगुरू होण्यासाठीची गुरुकिल्ली आपल्याला दिलेली आहे. जेव्हा आपण संपूर्ण विश्वालाच आपलं घर समजतो, आपली तशी धारणा पक्की होते. त्यावेळेला आपण चराचरात व्यापून राहिलेले असतो. इतकी व्यापक संकल्पना देणारा जगातील 'ज्ञानेश्वरी' हा एकमेव ग्रंथ आहे, यात तीळमात्र शंका नाही.

माऊलींनी ज्ञानेश्वरीचा हा वाग्यज्ञ पूर्ण केल्यानंतर भगवंतांकडे मागणं मागितलं. त्यांनी पार पाडलेल्या या यज्ञामुळे संतुष्ट होऊन मला पसायदान नावाचं बक्षीस दे, अशी त्यांनी त्या विधात्याकडे विनवणी केली आहे. या विश्वामध्ये जे जीव आहेत, त्यांचं सर्व दु:ख नष्ट होऊ दे, या जीवांमध्ये, परस्परांमध्ये मैत्री भाव वाढत राहो, संपूर्ण सृष्टीमध्ये आनंद आणि सुख नांदो, अशी विश्व प्रार्थना माऊलींनी आपल्या पसायदानाच्या माध्यमातून केली आहे. माऊलींचे हे कार्य सृष्टीच्या अंतापर्यंत संपूर्ण मानव जातीला मार्गदर्शन करेल, यात शंका नाही.

**(अवर सचिव, महाराष्ट्र शासन)**

**भावनिक बुद्धिमत्ता बुद्ध्यांकापेक्षा जास्त महत्त्वाची असू शकते का? या प्रश्नाचे विस्तृतपणे विवेचन करणारे व ५० लाखांपेक्षा जास्त विक्री झालेले डॅनिअल गोलमन यांचे 'इमोशनल इंटेलिजन्स' हे पुस्तक म्हणजे हुशार असणे म्हणजे काय हे नव्याने सांगणारे, हुशारीसंबंधीच्या जुन्या समजुतींना हादरवून टाकणारा संदर्भग्रंथच म्हणावा लागेल....**

# भावनिक बुद्धिमत्तेची गुरुकिल्ली

**प्रदीप बटुळे**


जोडीदारासोबत नेहमीची भांडणे, कौटुंबिक कलह, प्रेमातील अपयश, कामाच्या ठिकाणी निर्माण होणार ताण, धकाधकीच्या प्रवासामुळे होणारा ताण; तसेच काही बाबतीत नैराश्य, उदासीनता येणे किंवा बऱ्याच वेळा भीतीने किंवा चिंतेने ग्रासले जाणे इ. अशी बरीच उदाहरणे देता येतील, जी भावनेशी संबंधित आहेत.

भावना म्हणजे नेमके काय हे समजून घेतल्याशिवाय त्या कशा हाताळाव्यात हे समजणे फार कठीण आहे. काही महत्त्वाच्या भावना राग, वैर, चीड, आळस, शत्रुत्व, द्वेष, दु:ख, औदासीन्य, हताशपणा, निराशा, भय, चिंता, काळजी, उतावीळपणा, रुखरुख, बैचैनी, सुख, आराम, तृप्ती, इंद्रियजन्य सुख, अत्यानंद, प्रेम, स्वीकार, मित्रत्व, विश्वास, पूज्यभाव, समर्पण, मोह, भुरळ, नवल, आश्चर्य, तिटकारा, किळस, अनादर, तुच्छता, लजा, अपराधभाव, गोंधळणे, हिरमोड, वावडे, नावड अशी अनेक भावनेची उदाहरणे देता येतील.

समाजात बऱ्याच व्यक्ती भावनेच्या आहारी गेलेल्या दिसतात. त्यामुळे त्या व्यक्ती भयंकर ताणतणावाखाली, चिंताग्रस्त किंवा भीतीने ग्रस्त असल्याचे आढळून येतात. आपण भावनांचे

गुलाम न बनता भावना आपल्या अधीन असणे आवश्यक आहे. खरेतर भावनिक बुद्धिमत्ता ही आत्मसन्मानावर (Self-esteem) अवलंबून असते. आपण स्वतःला काय समजतो आणि आपली स्वतःविषयी काय मते आहेत, यावरून त्या व्यक्तीचा आत्मसन्मान ठरत असतो. भावनिक बुद्धिमत्ता असणाऱ्या व्यक्तींचा आत्मसन्मान उच्च दर्जाचा असतो. अशा व्यक्ती भूतकाळात न रमता व भविष्याची काळजी न करता, वर्तमानावर लक्ष केंद्रित करत असतात. त्यामुळे त्या समतोल स्थितीत असतात. ना भीती, ना चिंता, ना ताणतणाव, ना दुःख, ना पश्चात्ताप अशा अनेकविध निश्चल मनःस्थितीच्या अवस्थेत या व्यक्ती वावरत असतात. अशा व्यक्तींमध्ये भावनिक बुद्धिमत्ता उच्चकोटीची असल्याचे दिसून येते.

वैद्यकीय क्षेत्रात भावनिक बुद्धिमत्तेला उच्च स्थान देणे आवश्यक असल्याचे डॅनिअल गोलमन याचे मत आहे. या क्षेत्रात रुग्णावर शारीरिक उपचार केले जातात; पण भावनिक आधाराची कमतरता दिसून येते. बऱ्याच रुग्णांना आजाराविषयी भावनिक समाधान झाल्यास ते आजार लवकर बरे होण्यास मदत होते, असे डॅनिअल गोलमन यांना वाटते. हेच तत्त्व कुटुंबातही लागू होते. कुटुंबात ज्या व्यक्तीच्या भावनेची किंमत केली जात नाही, अशा व्यक्ती शारीरिक व मानसिकदृष्ट्या कमकुवत बनतात. त्यांना विविध शारीरिक व मानसिक व्याधी जडू शकतात. त्यामुळे प्रत्येकाच्या भावनेला समजून घेऊन त्यानुसार कृती करणे आवश्यक आहे.




पती-पत्नीमध्ये एकमेकांच्या भावना समजून न घेतल्यामुळे त्यांच्यात भावनिक दुरावा निर्माण होत चालला असून; काहीही घडो पण मला त्रास नाही झाला पाहिजे, अशी विचारप्रणाली विकसित होत चालली आहे. बरेच जोडीदार एकमेकांना भावनिक आधार देण्यात कमी पडल्याने, भावनांचे दमन होऊन एकाकीपणा वाढत जातो, ज्यामुळे घटस्फोटाच्या प्रमाणातही वाढ होते. एकाकीपणा हा प्राणघातक आजाराइतकाच घातक आहे. यामुळे आपल्या भावना कुठलाही आडपडदा न ठेवता मोकळ्या करता येतील, याची काळजी प्रत्येकाने घेणे आवश्यक आहे. म्हणजे हक्काचा जोडीदार, मित्रमैत्रीण किंवा अन्य व्यक्ती असावीच!

परिसमधील मज्जातंतुशास्त्रज्ञ फ्रान्सिस्को व्हॅरेला सांगतात की, आपली रोगप्रतिकारक यंत्रणा ही शरीराचा मेंदू असते. शरीरात, रक्तात कोणते घटक हवेत आणि कोणते नकोत, हे ती ठरवते. चिंता, भय, ताण या गोष्टींचा आपल्या मज्जासंस्थेवर घातक परिणाम होऊन, आपली प्रतिकारशक्ती कमी होते. याचा परिणाम म्हणजे नेहमी सर्दी, फ्लू, हार्पिस होणे, पती-पत्नीमध्ये जोर जोराचे भांडण झाले, तर त्यातील भावनिक व्यक्तीला तीन-चार दिवसांत सर्दी होण्याची शक्यता असते.

स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या मेडिकल स्कूलमध्ये केलेल्या संशोधनामध्ये क्रोध ही एकच अशी भावना आहे की, जी हृदयासाठी अत्यंत घातक ठरू शकते, असे निष्कर्ष काढले गेले आहेत. ड्युक विद्यापीठातील डॉ. रेडफोर्ड विलियम्स यांच्या संशोधनातून, जे जास्त वैरभाव बाळगतात असे लोक वयाची पन्नाशी उलटेपर्यंत मरण पावण्याचा दर सातपटीने जास्त होता, असे दिसून आले. धूम्रपान, उच्च रक्तदाब, रक्तात वाढलेली चरबी या घटकांपेक्षा हा घटक कमी वयात मृत्यू आणणारा शक्तिशाली घटक आहे.

तणावाशी संबंधित आजारांचा अभ्यास करणारे येल विद्यापीठाचे मानसशास्त्रज्ञ ब्रुस मॅकईवन यांनी १९९३ मध्ये आर्विज ऑफ इन्ट्युनल मेडिसीनमध्ये या भावनांच्या परिणामांची नोंद घेतली आहे. या भावना रोगप्रतिकारक प्रणालीवर इतक्या विस्तृत हद्दीपर्यंत परिणाम करतात की, त्यामुळे कॅन्सर इतर अवयवात पसरण्याची गती वाढते, विषाणूंचा संसर्ग होण्याची शक्यता वाढते, रक्तवाहिन्यांमध्ये चरबी साठून त्या कडक होतात आणि रक्त गोठून हृदयरोगाचा झटका येऊ शकतो. 'अ' प्रकारचा मधुमेह वेगाने जडू शकतो आणि 'ब प्रकारचा मधुमेह अधिक वाढतो, दम्याचे झटके येऊ लागतात किंवा मुळातच असलेला दम्याचा विकार जास्त बळावतो. ताणतणावामुळे आतड्यांना जखम होऊन आंत्रव्रण होऊ शकतो त्यामुळे अन्नपचन प्रक्रियेत गडबड होऊन आतड्यांना सूज येते. ताण दीर्घकाळ टिकून राहिला तर प्रत्यक्ष मेंदूवर अनिष्ट परिणाम होऊ शकतात. अशी बरीच उदाहरणे या पुस्तकात दिलेली आहेत. ज्या योगे आपल्या भावना किती महत्त्वाच्या आहेत याची प्रचिती येते. रडून मन मोकळे करणे यास झिलमन यांनी भ्रामक कल्पना म्हटले आहे; कारण रडून आपण त्या भावनांतून मुक्त होत नाही, उलट त्या अधिक दृढ होतात, असे म्हटले आहे.

शेवटी कुठल्याही कलहामध्ये प्रत्येकाने मी जबाबदार आहे ही विचारप्रणाली विकसित करणे आवश्यक आहे. भावनिक बद्धिमत्तेत स्वतःच्या भावना ओळखून त्यावर उपाययोजना करणे, स्वतःचा स्वीकार करणे, स्वतःशी सुसंवाद साधणे, जीवनाविषयी सकारात्मक दृष्टिकोन बाळगणे, जोडीदाराविषयी आदरभाव ठेवणे, आशावादी विचारसरणी अंगीकारणे, वैयक्तिक टीका न करणे, भांडणापेक्षा तात्पुरती माघार घेणे (वातावरण निवळेपर्यंत), दुसऱ्यांना दोष देण्यापेक्षा मी काय करणे आवश्यक होते याचा विचार करणे; तसेच स्वतःला भावनिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी ध्यानधारणा व सकारात्मक प्रार्थना करणे फायदेशीर ठरते. चांगले जीवन जगणे हा सर्वांचा हक्क आहे आणि भावनिक बुद्धिमत्तेशिवाय चांगले जीवन जगणे केवळ अशक्य आहे. भावनेच्या आहारी न जाता भावनेला काबूत ठेवून भावनेचा वापर आपल्या भल्यासाठी करणे, हा या पुस्तकाच्या लेखकाचा हेतू आहे. त्यामुळे हे पुस्तक फक्त वाचनासाठीच नव्हे, तर संग्रही ठेवावे असे आहे.

आपलं मंत्रालय जून २०१८ मधून पुनर्मुद्रित.

**(निवडश्रेणी लघूलेखक, महाराष्ट्र शासन)**

# कर्मयोगी भारत अभ्यासक्रम

कर्मयोगी भारत

लोकहितं मम करणीयम्

**www.igotkarmyogi.gov.in**

निरंतर शिक्षण आणि विकासाद्वारे नागरी सेवेत परिवर्तन घडवून आणणे हा केंद्र शासनाच्या कर्मयोगी भारत योजनेचा उद्देश आहे. केंद्र शासनाच्या या योजनेंतर्गत अनेक अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तथापि अनेक शासकीय अधिकारी–कर्मचारी यांना नेमके कोणते अभ्यासक्रम निवडावेत, हे उमजत नसल्यामुळे प्रशासन व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञान, याचा विचार करून खालीलप्रमाणे २० अभ्यासक्रम निवडण्यात आले आहेत. या अभ्यासक्रमाचा उपयोग सर्व शासकीय कर्मचारी विशेषत: माहिती व जनसंपर्क विभागातील अधिकाऱ्यांना होईल. (संकेतस्थळ– https://igotkarmayogi.gov.in)

## अभ्यासक्रमांची यादी

1. Beyond words, Mastering listening
2. Advance administrative law
3. Digital Marketing for public service
4. RTI
5. Sustainable development practices
6. AI for presentations
7. Public relations skills
8. Smart media practices for public servents.
9. Fundamental of public policy
10. Media Post
11. Code of conduct for Government
12. Noting and Drafting
13. Project Management
14. Budget Document Presentation
15. Budget and related activities
16. Public Administration
17. Do and Don't of social media.
18. PPP
19. Understanding Digital Marketing
20. Karmyogi Prarambh Module

# शासकीय कर्मचाऱ्यांच्या सोशल मिडिया वापराबाबत मार्गदर्शक सूचना

१) प्रस्तुत मार्गदर्शक सूचना खालील अधिकारी/कर्मचाऱ्यांना लागू राहतील :-

अ) महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील अधिकारी/कर्मचारी
(प्रतिनियुक्तीने तसेच करारपद्धतीने, बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसह)

ब) स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यामधील अधिकारी/कर्मचारी
(प्रतिनियुक्तीने तसेच करार पद्धतीने, बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसह)

२) राज्य शासनाच्या किंवा भारतातील अन्य कोणत्याही शासनाच्या चालू किंवा अलीकडच्या धोरणावर किंवा कृतीवर प्रतिकूल टीका करू नये.

३) शासकीय कर्मचाऱ्याने सोशल मीडियाचा वापर अत्यंत जाणीवपूर्वक व जबाबदारीने करावा.

४) शासकीय कर्मचाऱ्याने त्याचे वैयक्तिक व कार्यालयीन सोशल मीडिया खाते (अकाऊंट) हे दोन्ही स्वतंत्र ठेवावेत.

५) केंद्र/राज्य शासनाने बंदी घातलेल्या वेबसाइट, ॲप, इ. चा वापर करू नये.

६) शासनाद्वारे प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने शासकीय योजना, उपक्रम इत्यादींच्या प्रसार व प्रचारासाठी; तसेच लोकसहभागाकरिता केवळ शासकीय तसेच अधिकृत माध्यमांचा वापर करता येईल.

७) कार्यालयांतर्गत कामकाजाबाबत समन्वय/संपर्क साधण्यासाठी व्हॉट्सॲप, टेलिग्राम, इ. मेसेजिंग प्लॅटफॉर्मचा वापर करता येईल.

८) शासनाच्या/विभागाच्या योजना/ उपक्रम यांच्या यशस्वितेच्या अनुषंगाने अधिकारी-कर्मचारी यांनी सांघिक प्रयत्न केल्याबाबत सोशल मीडियावर मजकूर लिहिता येईल, मात्र त्यामुळे स्वयंप्रशंसा होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

९) अधिकाऱ्यांनी केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण शासकीय कामाबाबत मजकूर पोस्ट करता येईल, मात्र त्याद्वारे स्वयंप्रशंसा होणार नाही, याची खबरदारी घ्यावी.

१०) वैयक्तिक सोशल मीडिया अकाऊंटवर केवळ प्रोफाईल फोटो वगळता, आपल्या शासकीय पदनामाचा लोगो, वर्दी/गणवेष; तसेच शासकीय मालमत्ता जसे की- वाहन, इमारत, इत्यादींचा वापर फोटो/रिल्स/व्हिडीओ अपलोड करताना टाळावा.

११) आक्षेपार्ह, द्वेषमूलक, मानहानीकारक; तसेच भेदभाव उत्पन्न होणारे मजकूर, इ. शेअर / अपलोड/फॉरवर्ड करू नयेत.

१२) प्राधिकृत केल्याशिवाय; तसेच पूर्व मंजुरीशिवाय कोणतेही गोपनीय दस्तऐवज, शासकीय; तसेच कार्यालयीन कागदपत्रे, अंशतः तसेच पूर्ण स्वरूपात शेअर/अपलोड/फॉरवर्ड करू नयेत.

१३) बदली झाल्यानंतर कार्यालयीन सोशल मीडिया अकाऊंट योग्य प्रकारे हस्तांतरित करावे.

१४) ज्या कर्मचाऱ्याकडून उपरोक्त मार्गदर्शक सूचनांचा भंग होईल, त्याच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९; तसेच अन्य संबंधित नियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.







# लिहिते व्हा...

## आपलं मंत्रालय




माहिती व जनसंपर्क महासंचालनालयनिर्मित 'आपलं मंत्रालय' (डिजिटल आवृत्ती) तयार करण्याचे नियोजित आहे. मंत्रालयातील विविध विभागांचे अधिकारी–कर्मचारी यांनी आपल्या कथा, कविता, स्वानुभव, पाककला, भ्रमंती, व्यंगचित्रे, विशेष छायाचित्रे; तसेच विभागातील पदोन्नती, निवृत्ती याबद्दल 'आपलं मंत्रालय' या गृहपत्रिकेसाठी लेखन साहित्य *(युनिकोड वर्ड फाईल स्वरूपात)* खालील दिलेल्या ई–मेलवर पाठवावेत.








## आपलं मंत्रालय

प्रकाशने शाखा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
१७ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई.
ई–मेल : aaplemantralay@gmail.com




Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR
Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR